cmyk

## संपादकीय

### बुद्धिबळाची नवी राणी दिव्या!

नागपूरच्या दिव्या देशमुखने सोमवारी वयाच्या १९व्या वर्षी बुद्धिबळातील नवी राणी बनण्याचा मान मिळवला. जॉर्जिया येथे झालेल्या महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्याने भारताच्याच कोनेरू हम्पीवर अंतिम फेरीत टायब्रेकरमध्ये मात केली. याबरोबरच दिव्याने सर्वांत युवा विश्वविजेती ठरण्याची किमया साधली. दिव्याच्या या कामगिरीवर चोहीकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. २०21 पासून महिलांच्या बुद्धिबळ विश्वचषकाला प्रारंभ झाला. यापूर्वी फक्त पुरुषांसाठीच विश्वचषक खेळवण्यात यायचा.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शिवभोजन थाळी योजना बंद होणार?

मुंबई-उद्धव ठाकरेंनी सुरु केलेली शिवभोजन थाळी बंद होण्याची शक्यता आहे. अनेक केंद्रावर गैरव्यव्हार होत असल्याच्या तक्रारी आल्याचे अन्न नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळांनी म्हटले आहे. वारंवार गैरव्यव्हार आढळल्यास सदर शिवभोजन थाळी केंद्र बंद करण्याचे निर्देश भुजबळांनी दिले आहेत. सध्या या योजनेसाठी २० कोटी रुपयांचे अनुदानाला अजित पवारांकडून मंजूरी देण्यात आली आहे. पुढचा निधी दोन तीन महिन्यांनी मिळू शकेल अशी माहिती आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–९६ | गुरूवार, दि.३१ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

**भारत पाकिस्तानविरुद्ध सेमीफायनल खेळणार नाही**

नवी दिल्ली-वर्ल्ड चॅम्पियनशिप लीजेंड्सबद्दल सूत्रांकडून मोठी बातमी आहे. पाकिस्तान भारताविरुद्ध सेमीफायनल खेळणार नाही. भारतीय खेळाडूंनी खेळण्यास नकार दिला. सेमीफायनल सामना दि. ३१ जुलै रोजी एजबॅस्टन येथे होणार होता.

**ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दुसऱ्यांदा जरांगे पाटील यांची घेतली भेट**

परळी येथील महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे या आज त्यांच्या कुटुंबासह मराठा आंदोलन म्हणून जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आंतरवाली सराटीमध्ये दाखल झाल्या होत्या. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दुसऱ्यांदा ही भेट घेतली असून मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची देखील विचारपूस केली.

**शनी शिंगणापूर देवस्थान बनावट ॲप प्रकरणाला गती**

शनी शिंगणापूर देवस्थानशी संबंधित बनावट ॲप प्रकरणात तपासाला गती आली आहे.देवस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांत तब्बल १ कोटींहून अधिक रक्कम जमा झाल्याचे उघडकीस आले आहे. संबंधित कंपन्यांनी वेळोवेळी थोड्या-थोड्या रकमेच्या स्वरूपात कधी १ लाख तर कधी २ लाख अशा प्रकारे ही रक्कम त्यांच्या खात्यांत वळवली जाते.

**आम्हाला न्याय मिळाला, सूर्यवंशी यांच्या आई भावूक**

परभणी-सोमनाथ सूर्यवंशी न्यायालयीन कोठडीत मृत्यू प्रकरणात आलेल्या निर्णयाचे सूर्यवंशी कुटुंबियांकडून स्वागत करण्यात आले आहे. आम्हाला न्याय मिळाला, जिल्हा न्यायालय उच्च न्यायालय आणि आता सर्वोच्च न्यायालयात आम्हाला न्याय मिळाला. सरकारने न्याय दिला नाही. मात्र न्यायालयाकडून आम्हाला न्याय मिळाला. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई भावूक झाल्या होत्या. प्रकाश आंबेडकर माझ्यासाठी भावासारखे उभे राहिले, असेही त्या म्हणाल्या.

# कृषी खात्यात १६९ कोटींचा घोटाळा?

## धनंजय मुंडे यांच्यावर आ.धस यांचा पुन्हा आरोप; एसआयटी चौकशीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या काही महिन्यापासून माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर घोटाळ्यांचे आरोप होत असून आता आ. सुरेश धस यांनी पुन्हा कृषी खात्यातील घोटाळ्याचा आरोप केला आहे. धनंजय मुंडे हे कृषिमंत्री असताना १६९ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या घोटाळ्याच्या एसआयटी चौकशीची मागणीही धस यांनी केली असून धनंजय मुंडे यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्याच्या चर्चेनंतर हा आरोप केला जात असल्याने खळबळ उडाली आहे.**



संतोष देशमुख खुन प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांना विरोधकांसह सत्ताधाऱ्यांकडूनही टार्गेट करण्यात आले. त्यामुळे त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यातच त्यांच्या कार्यकाळातील कृषी खात्यातील साहित्य खरेदी प्रकरण उच्च न्यायालयात ▶▶ पान २ वर

**नेमकं काय म्हणाले सुरेश धस?**

“आ. सुरेश धस म्हणाले, कृषी खात्यातील काही अधिकाऱ्यांनी तब्बल ७८ बोगस कंपन्या स्थापन केल्या आणि त्याद्वारे खतांचे लिंकिंग केले गेले. या कंपन्यांकडूनच खते खरेदी करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे. आपण यासंदर्भात कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्रा देसाई यांना पत्र लिहून चौकशीची मागणी केली आहे. यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेही ही मागणी लावून धरली आहे. धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात कृषी खात्याच्या बैठका आणि निर्णय प्रक्रिया वाल्मिक कराड हेच हाताळत होते, असे आ. धस म्हणाले. तसेच या प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांवरही धस यांनी आक्षेप घेतला आहे. या प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत केली जावी, असेही ते म्हणाले.

## सर्वोच्च न्यायालयाकडून उच्च न्यायालयाचा निकाल कायम

### सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात सरकारला मोठा दणका!

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महायुती सरकारला मोठा दणका दिला आहे. महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध विजयबाई वेंकट सूर्यवंशी' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने सूर्यवंशी यांच्या बाजूने निकाल देत उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.**



सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना या निकालाचे सविस्तर विश्लेषण केले. ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने आमचे म्हणणे ऐकून घेतले आणि उच्च न्यायालयाचा गुन्हा दाखल करण्याचा निर्णय कायम ठेवला. पोलिसांनी एफआयआर नोंदवला नाही, त्यामुळे न्यायालयाच्या ▶▶ पान २ वर

## विधानसभेला बंडखोरी आता मुंडे-सोळंकेचे गळ्यात गळे

### सहकारातील मस्टर माईंड राजाभाऊ मुंडे वर बाराशे कोटी घोटाळ्याचा आरोप



**बीड । प्रतिनिधी**

स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या कट्टर समर्थक समजले जाणारे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष राजाभाऊ मुंडे यांच्यावर जिल्हा बँकेमध्ये बाराशे कोटी रुपयांचा घोटाळा केल्याच्या आरोप असून त्यात ते आरोपी आहेत मागील विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवारा विरोधात मुलगा बाबरी ला पुढे करत बंडखोरी करून प्रकाश सोळंके यांच्याविरुद्ध दंड थोपटले होते आता ▶▶ पान २ वर

**पंकजा मुंडे कडून धनंजय मुंडे कडे**

“भाजपाचे कट्टर समर्थक राजाभाऊ मुंडे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत त्यांनी भाजपाला म्हणजेच मंत्री पंकजा मुंडे यांना सोडले असले तरी ते धनंजय मुंडे यांच्या तंबूत दाखल होत आहेत शेवटी या मुंडे कडून त्या मुंडे कडे एवढाच फरक आहे आणि प्रवेशाचे कारण स्थानिक राजकारण केशव आंधळे विरुद्ध राजाभाऊ मुंडे हेच आहे यापेक्षा वेगळे काही नसावे.

## कराड असलेल्या तुरुंगात स्पेशल फोन सापडला

### आ.धस यांची माहिती; सखोल तपास केल्यावर सगळं बाहेर येईल

**बीड । प्रतिनिधी**

**महादेव मुंडेंचे प्रकरण मी काढलेले असून सर्वात आधी मी बोललो. आधी कोणी बोलत नव्हते असे सांगून आ. सुरेश धस म्हणाले, वाल्मिक कराड असलेल्या बीड जिल्हा कारागृहात एक स्पेशल फोन सापडला असून त्याचा सखोल तपास केल्यावर तेथून कोण -कोणाला बोलले हे उघड होईल, असे ते म्हणाले.**



संतोष देशमुख खुन प्रकरणात वाल्मिक कराड हा बीड जिल्हा कारागृहात असून तेव्हापासून हे तुरुंग वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आहे. त्यातच आता आ. सुरेश धस यांनी तुरुंगात एक स्पेशल फोन सापडल्याचे सांगून खळबळ उडवून दिली आहे. आ. धस म्हणाले, मी महादेव मुंडे प्रकरण उजेडात आणले असून त्यांना न्याय मिळायला हवा. आता तर बीडच्या तुरुगांतून एक स्पेशल फोन सापडल्याचे सांगून आ. धस म्हणाले, या फोन प्रकरणाची सखोल ▶▶ पान २ वर

## नराधाम पित्यास अजीवन कारावासाची शिक्षा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वत:च्याच पोटच्या मुलीवर अत्याचा करून तिला गर्भवती करणाऱ्या निष्ठुर पित्यास मरेपर्यंत जन्मठेप अशी शिक्षा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी बुधवारी ठोठावली. बाळासाहेब महादेव गायकवाड, रा.उमराई ता. अंबाजोगाई असे त्या शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



अंबाजोगाई तालुक्याती उमराई येथील गायकवाड कुटूंब ऊसतोड मजुरीचे काम करते. या कुटूंबातील पिढीत मुलीचे अचानक पोट दुखू लागल्याने तीच्या आईने तिला उपचारासाठी रूग्णालयात नेले. उपचारादरम्यान ती पिढीत मुलगी गरोदर ▶▶ पान २ वर

## आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महावितरणाशी संबंधित प्रश्न मंत्रालयीन बैठकीत मांडले

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचा गलथान कारभाराची सभागृहात चीरफाड केली होती. गुत्तेदार आणि अधिकारी यांच्या मिलीभगत ने चालू असलेले सर्व गैरप्रकार मुद्देसूद मांडले होते. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या उर्जा राज्यमंत्री ना.मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली, बीड



जिल्ह्यातील उर्जा विभागांशी संबधित प्रश्नांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बीड विधानसभा मतदारसंघातील महावितरणशी संबंधित असलेले विविध प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांनी मांडले

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ८ जुलै रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी महावितरण विभागाचा गलथान कारभार उघड केला होता. गुत्तेदार आणि अधिकारी संगनमत करून कशाप्रकारे गैरप्रकार करतात हे उघडकीस आणले होते. हा मुद्दा अधिवेशनात गाजला होता. त्यानंतर ▶▶ पान २ वर

## जामखेडच्या तहसीलदारांची गडचिरोलीला बदली

**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेडच्या तहसीलदारांची गडचिरोली येथे बदली करण्यात आली असून या बदलीमुळे कर्जत-जामखेड मतदारसंघात मात्र राजकीय वातावरण चांगलेच गरम झाले आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठीची गटरचना करताना विशिष्ट गटात सोयीच्या विशिष्ट गावांचा समावेश करण्याचा सत्ताधाऱ्यांचा आदेश न जुमानल्याने तहसीलदारांची गडचिरोलीला बदली करण्यात आल्याचा घणाघाती आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे.ङ्गजामखेडचे तहसीलदार गणेश माळी यांच्या बदलीचा मंगळवारी आदेश निघाला असून त्यांची धानोरा ▶▶ पान २ वर

## लाडक्या बहिणींना तीन दिवसात १५०० रुपये मिळणार

### जुलै महिन्याच्या हप्त्यासाठी २९८४ कोटी वर्ग, शासन निर्णय जारी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना जुलै महिन्याच्या हप्त्याची रक्कम दोन ते तीन दिवसांमध्ये मिळू शकते. त्यासाठी राज्य शासनाने २९८४ कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.**



लाडक्या बहिणींना जुलै महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता देण्यासाठी शासनाची चांगलीच दमछाक होत असल्याचे दिसते. यावरुन विरोधकांसह सत्तेतील मंत्र्यांनी पण उघडपणे भुमिका मांडली आहे. त्यातच आता लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना जुलै महिन्याचा हप्ता येत्या दोन ते तीन दिवसात मिळण्याची शक्यता आहे. राज्याच्या ▶▶ पान २ वर

## तुळजाभवानी मंदिरात गाभाऱ्यातील दर्शन बंद

### मंदिर समितीचा निर्णय, भाविकांना केवळ मुखदर्शन

**तुळजापुर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना महत्त्वाची सूचना आहे. कारण, येथील तुळजाभवानी देवीचे मुख्य गाभाऱ्यातील दर्शन १ ते १० ऑगस्ट या कालावधीत बंद राहणार आहे.**

देवीच्या सिंहाच्या गाभाऱ्यातील जीर्णोद्धाराच्या कामासाठी दर्शन बंद करण्यात येणार आहे. कारण, पुरातत्व खात्याकडून येथे काम ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ५४.०० क्विंटल | २,४२१ | २,८०० | २,६१७ |
| ज्वारी/हायब्रिड : ५२.५० क्विंटल | १,८७१ | २,७८१ | २,३४३ |
| मका/लोकल:०.५० क्विंटल | २,२७० | २,२७० | २,२७० |
| तूर : २२.०० क्विंटल | ४,००० | ६,४५० | ५,६६५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २४.०० क्विंटल | २,०११ | २,९२१ | २,५४८ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ४,७०० | ६,२५१ | ५,७६२ |

## बीड जिल्ह्यात ७४ टक्के शेतकऱ्यांना मिळाला फार्मर आयडी

**बीड । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे . जिल्ह्यातील एकूण ६,२१,५१६ पात्र शेतकऱ्यांपैकी ४,६१,८८९ शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे . हे प्रमाण ७३.६६ टक्के इतके असून , उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने आपली नोंदणी करून घ्यावी , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन केले आहे.**



२४ जुलै रोजी सर्व महसूल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली होती यावेळी अपर जिल्हाधिकारी सर्व उपजिल्हाधिकारी तहसीलदार उपस्थित होते . या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तात्काळ काढून घेण्याबाबत आवाहन केले होते. यासंदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले आहे . या विषयाच्या संदर्भाने आणि इतर विषयांबद्दल बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी , सर्व कृषी सहाय्यक यांची संयुक्त बैठक सामाजिक न्याय भवन येथे घेतली . यावेळी नुकताच पदभार घेतलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी व इतर अधिकारी उपस्थित होते . यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी नमूद केले की फार्मर आयडी ही शेतकऱ्यांची अधिकृत ओळख आहे . याशिवाय कोणत्याही शासकीय शेतीसंबंधित योजनेचा लाभ घेता येणार नाही . ▶▶ पान २ वर

## भररस्त्यावर पती पत्नीत मारामाऱ्या

**बीड । प्रतिनिधी**

पती पत्नीमध्ये आज सकाळी नगर रोडवर वादा वादी होवून चांगल्याच मारामाऱ्या झाल्या. पत्नीने गाडीवर बसलेल्या पतीला झोडपले. पतीनेही प्रतिउत्तरात पत्नीला मारहाण केली. या दोघांची मारहाण नगर रोडवरील लोक पाहत होते. काहींनी त्यांचा व्हिडिओ शुट केला व सोशल मिडीयावर टाकला. पत्नील विदर्भातील तर पती बीड येथील असल्याचे सांगण्यात येते. या दोघांमध्ये भांडण कोणत्या कारणावरून झाले ते मात्र समजू शकले नाही. हे पती पत्नीचे भांडण पोलीस ठाण्यापर्यंत गेले होते.

आज सकाळी नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या एका मोटार सायकलवर आलेल्या पतीस पत्नीने अडवून त्यास जाब विचारला. या दोघांच्या बाचाबाचीतून दोघात चांगलेच भांडण झाले. पत्नीने चक्क पतीला मारहाण करण्यास सुरूवात केली. पतीनेही प्रतिउत्तराखातर पत्नीला मारहाण ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बुद्धिबळाची नवी राणी दिव्या!

नागपूरच्या दिव्या देशमुखने सोमवारी वयाच्या १९व्या वर्षी बुद्धिबळातील नवी राणी बनण्याचा मान मिळवला. जॉर्जिया येथे झालेल्या महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्याने भारताच्याच कोनेरू हम्पीवर अंतिम फेरीत टायब्रेकरमध्ये मात केली. याबरोबरच दिव्याने सर्वांत युवा विश्वविजेती ठरण्याची किमया साधली. दिव्याच्या या कामगिरीवर चोहीकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. २०२१ पासून महिलांच्या बुद्धिबळ विश्वचषकाला प्रारंभ झाला. यापूर्वी फक्त पुरुषांसाठीच विश्वचषक खेळवण्यात यायचा. यापूर्वी २०२१ व २०२३ मध्ये झालेल्या महिलांच्या विश्वचषकात भारताची एकही बुद्धिबळपटू उपान्त्य फेरीपर्यंत पोहोचली नव्हती. दिव्या प्रथमच विश्वचषकात सहभागी झाली होती. ग्रँडमास्टर हा 'नॉर्म' मिळवण्यासाठी दिव्याला या स्पर्धेत छाप पाडणे गरजेचे होते. फिडे म्हणजेच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघातर्फे आयोजित जागतिक पातळीवरील स्पर्धांमध्ये अपेक्षित गुण कमावण्यासह मानांकित खेळाडूंना पराभूत केले तरच 'ग्रँडमास्टर' हा नॉर्म मिळतो. दिव्याने या स्पर्धेत तिच्यापेक्षा जागतिक क्रमवारीत वरच्या स्थानी असलेल्या खेळाडूंना नमवण्याचा पराक्रम केला.

त्यामुळेच ती ग्रँडमास्टर किताब मिळवणारी भारताची चौथी महिला ठरली. यापूर्वी हम्पी, द्रोणावली हरिका व आर. वैशाली यांनी अशी कामगिरी केली आहे. मुख्य म्हणजे हम्पीने २००२ मध्ये ग्रँडमास्टर हा नॉर्म मिळवला, तेव्हा दिव्याचा जन्मही झाला नव्हता. २००५ मध्ये जन्मलेल्या दिव्याने कनिष्ठ गटात जागतिक स्पर्धा जिंकली. तेव्हापासून तिने मागे वळून पाहिले नाही. नागपूरमध्ये जन्मलेल्या दिव्याचे आई-वडील हे दोघेही डॉक्टर आहेत. आई नम्रता ही दिव्यासोबत प्रामुख्याने सर्व स्पर्धांसाठी जाते. विश्वचषक विजयानंतर दिव्याने सर्वप्रथम धावत येऊन आईला घट्ट मिठी मारली. हा क्षण खूपच भावनिक होता. शालेय वयापासूनच दिव्याला बुद्धिबळाची आवड निर्माण झाली. वयाच्या पाचव्या वर्षापासून तिने बुद्धिबळ खेळण्यास प्रारंभ केला. तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्तम यश मिळवले. नंतर कनिष्ठ वयोगटातील स्पर्धांमध्येही तिने छाप पाडली. २०२१ मध्ये तिने महिला ग्रँडमास्टर हा नॉर्म मिळवला. २०२२ च्या चेस ऑलिम्पियाडमध्ये तिने कांस्यपदक मिळवले. त्याच वर्षी तिने राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम केला. २०२० मध्ये ऑनलाईन ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताने जेतेपद मिळवले, त्यावेळी दिव्या त्या स्पर्धेचा भाग होती. २०२३ मध्ये दिव्याने आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टरचा नॉर्म मिळवला. २०२४ मध्ये भारताने ऑलिम्पियाडमध्ये दुहेरी सुवर्ण जिंकले. त्यावेळी महिला संघाच्या विजयात दिव्याचे मोलाचे योगदान होते. त्याच वर्षी तिने २० वर्षांखालील जागतिक स्पर्धा जिंकण्याचा विक्रम केला. त्यामुळे जगभरात दिव्याचे नाव झाले. १०७ खेळाडूंसह यंदाच्या विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली. दिव्याला या स्पर्धेसाठी १५ वे मानांकन होते तर अंतिम फेरीतील भारतीय स्पर्धक हम्पीला चौथे मानांकन होते. दिव्याने पहिल्या दोन फे-यांमध्ये सहज विजय मिळवले. चौथ्या फेरीत तिच्यासमोर चीनच्या दुस-या मानांकित झू जायनरचे आव्हान होते. दिव्याने तिला नमवून सा-यांनाच धक्का दिला. उपान्त्यपूर्व फेरीत दिव्याने आपल्याच देशाच्या हरिकावर सहज मात केली. उपान्त्य फेरीत दिव्यासमोर चीनच्या तिस-या मानांकित टॅन झोंगाईचे कडवे आव्हान होते. कारण टॅनने जागतिक विजेतेपद मिळवले असून कँडिडेट्स स्पर्धाही जिंकली आहे.

दिव्याने तिलाही धूळ चारली. दुसरीकडे हम्पीनेसुद्धा उपान्त्य फेरीत चीनच्या अग्रमानांकित ले टिंगेईला पराभूत केले. त्यामुळे प्रथमच भारताचे दोन बुद्धिबळपटू अंतिम फेरीत दाखल झाले. अंतिम फेरीत हम्पीचे पारडे जड होते. कारण तिच्याकडे इतक्या वर्षांचा अनुभव होता शिवाय ती कँडिडेट्स स्पर्धाही खेळली होती. परंतु दिव्याने आपल्या देहबोलीने हम्पीला दबावात आणले. दिव्या झटपट चाली रचत होती तर हम्पी विचारपूर्वक खेळत होती. पहिला डाव बरोबरीत सुटल्यावर हम्पीला संधी होती. परंतु दिव्याने उत्तम बचाव केला. टायब्रेकरमध्ये दिव्याने संयम बाळगून हम्पीला चुका करण्यास भाग पाडले. मुख्य म्हणजे दिव्याकडे प्रत्येक चालीसाठी पुरेसा वेळ होता. कदाचित त्याचे हम्पीवर दडपण आले असावे. अखेर टायब्रेकरमध्ये हम्पी मागे पडली. तिने पुढील डावाचा विचार केला तर दिव्याने मात्र सुरू असलेल्या डावावर लक्ष केंद्रित केले. जणू काही तिला अर्जुनाप्रमाणे फक्त पक्ष्याचा डोळा दिसत होता! त्यामुळे पुढील डावात काय होईल याचा विचार न करता दिव्याने जे डोळ्यासमोर सुरू आहे त्यावर लक्ष देत सामना जिंकण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. याचेच फलित म्हणजे हम्पीने हार मानली आणि दिव्याने बाजी मारली.

हम्पी मानसिकदृष्ट्या कणखर असली तरी दिव्याचा आत्मविश्वास व सकारात्मक देहबोलीसमोर ती डगमगताना दिसली. महिला विश्वचषकासह दिव्याने भारताची ८८ वी ग्रँडमास्टर होण्याचा मान पटकावला आहे. अंतिम फेरीतील दोन्ही क्लासिकल डाव बरोबरीत सुटल्यानंतर दिव्याने टायब्रेकरद्वारे विश्वविजेतेपदाचा निकाल आपल्या बाजूने झुकवला. दिव्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या कामगिरीमुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळेल. कोनेरू हम्पीनेसुद्धा संपूर्ण स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. 'दोन्ही खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा' असे पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. कमी वयात ग्रँडमास्टर किताब आणि जागतिक अजिंक्यपद मिळवणे ही अभिमानाची गोष्ट आहे. दिव्या ही नागपूरची शान आणि देशाचा अभिमान आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिव्या देशमुखचे कौतुक केले आहे. या विश्वविजयाबद्दल दिव्याला ५० हजार अमेरिकन डॉलर (सुमारे ४३ लाख रुपये)चे बक्षीस मिळाले आहे. या स्पर्धेत दिव्यासह भारताच्या ९ महिला बुद्धिबळपटूंचा तसेच जगभरातील ४६ वेगवेगळ्या बुद्धिबळ महासंघातील एकूण १०७ सर्वोत्तम महिला बुद्धिबळपटूंचा सहभाग होता. विशेष म्हणजे जागतिक पातळीवरील टॉप २० पैकी १७ बुद्धिबळपटू या स्पर्धेत होते. त्यामुळे अवघ्या १९ वर्षांच्या दिव्याचे हे यश आणखीनच उजळून निघाले आहे. बुद्धिबळातील मानाचा ग्रँडमास्टर किताब मिळवण्यासाठी २५०० मानांकन (रेटिंग) आणि ग्रँडमास्टरचे तीन नॉर्म आवश्यक असतात. मात्र विश्वविजेतेपदामुळे तिला हा किताब थेट मिळाला. तिचे हे यश तिच्या दुर्दम्य जिद्दीचे आणि दृढतेचे प्रतीक आहे. बुद्धिबळ जगतात भारताचा तिरंगा डौलाने फडकविणा-या मराठमोळ्या दिव्या देशमुखचे मन:पूर्वक अभिनंदन!

# पीक विम्याचे निकष पूर्वीप्रमाणेच करून मुदतवाढ द्या-डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने पिकविमा योजनेत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे. विमा योजनेत सहभागी होण्याची तारीख ३१ जुलै असताना राज्यात फार कमी शेतकऱ्यांनी विम्यासाठी अर्ज केले आहेत. आज पिक विमा भरण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे आता अर्जाची संख्या वाढण्याची शक्यता कमी आहे. येणाऱ्या काळात पावसाच्या लहरीपणामुळे पीक विम्या पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्याकरिता शासनाने पिक विमा भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि पीक विम्याचे नियम पूर्वीप्रमाणेच करावेत अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली आहे.**



राज्य सरकारने सुरू असलेली एक रुपयात पिक विमा योजना बंद केल्याने शेतकऱ्याला जास्तीची रक्कम भरावी लागते. या निर्णयामुळे शेतकरी या योजनेकडे पाठ फिरवताना दिसत आहेत. तसेच पिकविमा योजनेच्या भरपाईत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. आता पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवर आधारित नुकसान भरपाई दिली जाणार आहे. पूर्वी चार ट्रिगरच्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात होती, मात्र आता त्यात बदल झाल्याने शेतकरी नाराज आहे. प्रधानमंत्री कृषी पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ च्या विमा हप्ता भरण्यासाठीचा एक दिवस बाकी असतानाही राज्यातील नगण्य शेतकऱ्यांनी विमा हप्ता भरल्याचे निदर्शनास आले आहे. मागील योजनेतील महत्त्वाचे जे ट्रिगर होते त्यातील एक ट्रिगर हा पावसाने सतत २१ दिवसाचा खंड दिल्यास २५ टक्के अग्रीम मिळण्याची यात तरतूद होती. ती तरतूद वगळून केवळ नुकसान आधारित पिक विमा मिळण्याची तरतूद करण्यात आलेली असणे आणि शेतकऱ्यांना क्षेत्रानुसार प्रीमियम भरावा लागत असणे या बाबींमुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय संभ्रमाचे आणि निरुत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे आगामी काळातील निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसल्यास हा शेतकरी पूर्णपणे कोलमडून जाणार आहे. जेव्हा महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होतात तेव्हा या बाबींकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना या पिक विमा योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल आणि पुढील अनावस्था प्रसंग टळेल यासाठी पिक विमा भरण्याकरिता शेतकऱ्यांना मुदतवाढ द्यावी तसेच पीक विम्याचे निकष पूर्वीप्रमाणेच करावेत अशी महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.कृषिमंत्री यांना कळकळीचे विनंती करण्यात येत आहे.

# भविष्यात या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यात येणार-आ.विजयसिंह पंडित

## शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने मला आशिर्वाद देऊन विधानसभेत काम करण्याची संधी दिली, त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. केवळ राजकारण न करता टिपरे महोत्सवा बरोबरच विविध उपक्रम राबवून गेवराईची संकृती जतन करण्याचे काम करण्यात येत आहे.भविष्यात या टिपरे महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे असे प्रतिपादन महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.**



गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शारदा प्रतिष्ठान आयोजित टिपरे महोत्सवाचे उद्घाटन बुधवार दिनांक ३० जुलै रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम मांडुरके, नायब तहसीलदार सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरु, पोलिस निरीक्षक संतोषकुमार बांगर, सहायक पोलिस निरीक्षक संतोष जंजाळ, सहायक पोलिस निरीक्षक कोटकर, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, यांच्यासह परिक्षक सर्वश्री ॲड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते आणि संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला गेवराई येथील पारंपरिक टिपरी आणि सोंग महोत्सव हा सांस्कृतिक वारसा सक्षमपणे चालविण्यासाठी व ही परंपरा जतन करून टिपरे व सोंग या कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरातील ज्येष्ठ रंगकर्मी आणि तरुण कलावंताना सोबत घेऊन बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे टिपरे आणि सोंगस्पर्धेचे भव्यदिव्य आयोजन केले होते. विजयसिंह पंडित यांनी शिस्तबद्ध नियोजन करून हा टिपरे महोत्सव यशस्वी केला. टिपरे महोत्सवात गेवराई शहरातील महिलांसाठी भोलोबा (फेर) गित आणि नागमंत्री स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी टिपरे महोत्सव पाहण्यासाठी गेवराई शहरातील लहान मुले, मुली, महिला, तरुण आणि वयोवृद्ध जनतेने उत्सफुर्त गर्दी केली होती. सायंकाळी सात वाजता स्पर्धेचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थिती करण्यात आला. यावेळी ॲड सुभाष निकम यांनी स्पर्धेचे नियम आणि सुचनांची परिक्षक सुभाष निकम यांनी माहिती दिली. आ. विजयसिंह पंडित यांनी हा टिपरे महोत्सवात सातत्य राखून आयोजन केल्यामुळे कलाकारांना उर्जा मिळाली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने हा टिपरे महोत्सव गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. टिपरे स्पर्धेत ११ संघ तर भोलोबा स्पर्धेत ६ संघ आणि नागमंत्री स्पर्धत दोन सघ सहभागी झाले अशी माहिती त्यांनी दिली. टिपरे स्पर्धेची सुरुवात शिवनेरी संघाने केली. यावेळी विविध मान्यवर आणि पदाधिकारी कार्यकर्ते, महिला, पुरुष, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### कृषी खात्यात १६९

गेले. यात उच्च न्यायालयाने काही दिवसापुर्वीच धनंजय मुंडे यांना क्लिनचिट दिली होती. त्यानंतर आता आ. सुरेश धस यांनी मुंडे यांच्यावर त्याच साहित्या खरेदी प्रकरणात घोटाळ्याचा आरोप केला आहे. सुरेश धस यांनी नव्याने १६९ कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा दावा करत या प्रकरणाची स्वतंत्र (विशेष तपास पथक) चौकशीची मागणी केली आहे. धनंजय मुंडे यांना मंत्रीमंडळात घेण्याच्या सध्या जोरदार चर्चा असून त्यादृष्टीने अजित पवारांनी सुध्दा संकेत दिले आहेत. आता याच पार्श्वभुमीवर पुन्हा धनंजय मुंडे यांच्यावर सुरेश धस यांनी घोटाळ्याचे आरोप करुन एसआयटी चौकशीची मागणी केल्याने मुंडेंच्या अडचणी वाढणार असल्याचे दिसते.

-----------

### विधानसभेला बंडखोरी

आमदार सोळंके आणि राजभाऊ मुंडे हे गळ्यात गळा घालून अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत. सहकार तज्ञ आणि बीड जिल्ह्यातील येथे कालचे राजकारणी श्रीपतराव कदम बळवंतराव कदम यांच्या कार्यकाळामध्ये राजाभाऊ मुंडे उदयास आले त्यांच्याच हाताखाली सहकाराचे धडे घेतले राजाभाऊ मुंडे यांनी सहकार क्षेत्रामध्ये आपला धबधबा निर्माण केला होता याच माध्यमातून ते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या जवळ आले आणि ते त्यांचे खांदे समर्थन झाले स्वर्गीय मुंडे यांच्या अनेक निवडणुकांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती डोंगरपट्ट्यात भाजपाचे नेते म्हणून राजाभाऊ मुंडे यांची चांगली ओळख निर्माण झाली आणि ती होती आणि आहे मात्र आता ते भाजपाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करत आहेत विशेषता राजेभाऊ मुंडे आणि माजी आमदार केशव आंधळे या दोघात फारसे जमत नसल्याने एका पक्षात राहून वेगवेगळी तोंडे आतापर्यंत यांची दिसली आहेत त्यामुळे एका महिन्यात दोन तलवारी राहू शकत नाहीत त्याचप्रमाणे मुंडे आणि आंधळे यांचे आहे म्हणूनच राजाभाऊ मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला असावा २००९-१० मध्ये बीड जिल्हा बँकेचे अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळामध्ये बाराशे कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला जवळपास ९० कोटीचे बिगर शेतकरी कर्ज वाटले गेले अस्तित्वात नसलेल्या संस्थांनाही कर्ज देणे कार्यक्षेत्राबाहेर खर्च पुरवठा केला या सर्व आरोपावरून त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला ते काही काळ जेलमध्ये होते आता सध्या ते जामिनावर आहेत त्यापैकी त्यांच्यावरील आरोप निर्दोष झालेले नाहीत अशा काळात त्यांनी आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे विधानसभा निवडणुकीमध्ये प्रकाश सोळंके यांनाच माहितीचे उमेदवार असताना विरोध केला आता त्यांच्याच गळ्यात गळे घालून राष्ट्रवादीत प्रवेश होत आहे राजाभाऊ मुंडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये गेले असले तरी पंकजा मुंडे यांना सोडून धनंजय मुंडे यांच्याकडे गेल्याने शेवटी मुंडेच्याच नेतृत्वाखाली काम करावे लागणार असल्याने यातच त्यांना समाधान असावे असे दिसून येत आहे.

-----------

### सर्वोच्च न्यायालयाकडून उच्च

आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई होईल की नाही, हे पाहावे लागेल. उच्च न्यायालयाने याप्रकरणी एका आठवड्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश सरकारला दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात गुन्हा का दाखल झाला नाही, असा प्रश्न उपस्थित केला. प्रकाश आंबेडकर म्हणाले, या प्रकरणात दुर्दैवाची बाब म्हणजे स्वतः राज्य सरकारच आरोपी आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिस कोठडीत सरकारच्या ताब्यात असताना झाला. यापूर्वीच्या प्रकरणांप्रमाणे सरकारने याही वेळी जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला, पण आम्ही कोर्टाच्या निदर्शनास ही बाब आणली. आता उच्च न्यायालय यासंदर्भात नियम तयार करेल, ज्यामुळे भविष्यात पोलिस कोठडीतील मृत्यूंना न्याय मिळेल, असे ते म्हणाले.

-----------

### आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महावितरणाशी

याची दखल घेत सरकारने बुधवारी (दि.३०) रोजी मंत्रालयात महाराष्ट्र राज्याच्या उर्जा राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्यातील उर्जा विभागाशी संबंधित असलेल्या प्रश्नांवर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील विद्युत पुरवठ्यातील अनियमितता, तसेच कंत्राटदारांमार्फत होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत थेट तक्रार मांडली. तसेच नागरिकांच्या त्रासदायक अनुभवांना वाचा फोडत, विद्युत पुरवठा सुरळीत आणि दर्जेदार व्हावा यासाठी उर्जा विभागाने तात्काळ कार्यवाही करावी अशी स्पष्ट मागणी केली.

**आ.क्षीरसागर यांनी बैठकीत उपस्थित केलेले मुद्दे आणि मागण्या**

योजनेंतर्गत दि.१५.०९.२०२३ रोजी हायटेक ईलेक्ट्रीकलच्या नावे कार्यारंभ आदेश पारीत आहेत. आजतागायत ती कामे पुर्ण न होता ग्रामीण व शहरी भागात निकृष्ट दर्जा व अर्धवट स्वरूपाची कामे केल्याने तक्रारी प्राप्त आहेत. यावर तातडीने कार्यवाही व्हावी., पाली ता. बीड येथे मंजुर असलेले ३३ के.व्ही. उपकेंद्राचे कामाची निविदा प्रसारित करणे., ताडसोन्ना, लिंबारुई, च-हाटा, आहेरधानोरा, बोरखेड, मोरगाव ता. बीड, पाडळी, आर्वी ता. शिरूर का. व नगर रोड व बलगुजर (बीड शहर) या ठिकाणी नवीन उपकेंद्र मंजुर करणे., अंजनवती ता. बीड उपकेंद्रामध्ये अतिरिक्त पावर ट्रान्सफार्मर बसवणे., खापरपांगरी व पारगाव सिरस ता. बीड येथे नवीन सबस्टेशन २२० के.व्ही.चे मंजुर करणे, योजने अंतर्गत बोरखेड व चहऱ्हाटा ता. बीड येथे उपकेंद्र उभारण्यात यावे., योजनेमध्ये मंजुर असलेल्या कामांची निविदा प्रसारित करणे बाबत सुचित करावे., बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका गाव अंतर्गत, शहर अंतर्गत विद्युत तारा लोबकळेल्या आहेत. तसेच विद्युत पोल वाकलेले आहेत. यांची आवश्यक ठिकाणी दुरूस्ती करावी तसेच वाकलेले पोल आणि लोंबकळत असलेल्या विद्युत तारा बदलण्यात याव्यात., मुख्यमंत्री सौर उर्जा अंतर्गत शेतकरी बांधवांना देण्यात आलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. त्या बाबत संचिकानिहाय चौकशी करण्यात यावी., सन २०२० ते जुलै २०२५ या दरम्यान बीड विधानसभा मतदार संघात बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुका अंतर्गत सर्व लेखाशिर्ष अंतर्गत विकास कामे होत असतांना मोठ्या प्रमाणावर दुबारीकरण (ओव्हरलॅपिंग) झालेली आहे. हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला., बीड शहराची हद्दवाढ २००७ दरम्यान झालेली आहे. त्यानुषंगाने बीड शहरासाठी नव्याने ३०० पोल, तार, डी.पी. व इतर सामग्री देण्याची मागणी केली., बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर का. तालुका नवीन डी.पी.ची आवश्यकता असून मंजुर करणे बाबत मागणी केली.

-------------

### नराधाम पित्यास

असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेची माहिती पिढीत मुलीला तिच्या आईने विश्वासात घेवून विचारली असता पिढीत मुलीने तिच्या स्वतःच्या वडीलांनी केलेल्या अत्याचाराचा पाढा वाचून दाखविला. आरोपी बाळु उर्फ बाळासाहेब महादेव गायकवाड हा सात ते आठ महिन्यांपासुन दारू पिवून पिढीतेवर जबरदस्तीने अत्याचार करत होता. यातूनच पिढीत मुलगी गरोदर राहिली. ही घटना समोर आल्यानंतर पिढीतेच्या तक्रारीवरून आरोपी विरूद्ध धारूर पोलिस ठाण्यात कलम ३७६, ३७६ (२) (एफ.आय.एन) भादवी अन्वये पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला. या प्रकरणाचा पोलिस तपास फौजदार प्रकाश शेळके यांनी केला व आरोपी विरूद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. हे प्रकरण सुनावणीसाठी अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयासमोर आले. न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी सरकारी वकील ॲड.लक्ष्मण फड यांनी सादर केलेले साक्षीपुरावे तपासले तसेच सात साक्षीदार व डीएनए रिपोर्ट ही साक्ष ग्राह्य धरून आरोपीस मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणी सरकारी पक्षाच्या वतीने ॲड.लक्ष्मण फड यांनी बाजू मांडली.

-------------

### कराड असलेल्या तुरुंगात स्पेशल

चौकशी केली तर कोण -कोणाला जेलमधून फोन करीत होते, हे उघड होईल, असेही ते म्हणाले.

**देशमुख, मुंडे खुन प्रकरणाचा सीबीआय तपास करा-खा. सुळे**

संतोष देशमुख आणि महादेव मुंडे खुन प्रकरणाचा मुद्दा खा. सुप्रिया सुळे यांनी संसदेत उपस्थित करीत या दोन्ही प्रकरणाची स्वतंत्ररित्या सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली.

**ज्ञानेश्वरी मुंडे आज मुख्यमंत्र्यांना भेटणार**

महादेव मुंडे यांच्या हत्येला २१ महिने उलटूनही अद्यापही आरोपी फरारच आहेत. या प्रकरणात आता एसआयटी आणि सीआयडी मार्फत चौकशी व्हावी अशी मागणी मुंडे कुटुंबीयांकडून केली जात आहे. त्यामुळे न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे या दि. ३१ जुलै रोजी सकाळी ११. ३० वा वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

------------

### तुळजाभवानी मंदिरात

सुरू करण्यात आले आहे. मंदिर प्रशासनाच्या या निर्णयामुळे भाविकांची गैरसोय होणार असली तरी, १ ते १० ऑगस्ट या कालावधीत भाविकांना देवीचे फक्त मुखदर्शन घेता येणार आहे. तुळजाभवानी देवीच्या इतर धार्मिक विधी, सिंहासन पूजा, अभिषेक पूजा नियमित सुरू राहणार असल्याची माहिती मंदिर संस्थानकडून देण्यात आली आहे. तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून देवीच्या मंदिराचे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. त्यासाठी, हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, पुढील १० दिवस भाविकांना मुखदर्शनच घेता येईल. दरम्यान, तुळजाभवानी मंदिरात सुरु असलेल्या संवर्धनाच्या कामावर संभाजीराजे छत्रपती यांनी आक्षेप घेतला होता. चुकीच्या पद्धतीने तुळजाभवानी मंदिराचे संवर्धनाचे काम होत असल्याचे संभाजीराजे यांनी म्हटले होते. मंदिर संवर्धन करत असताना भिंतीवर केलेले ब्लास्टिंग चुकीचे असल्याची माहिती देत यापूर्वी संभाजीराजेंनी कामावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर, आता पुरातत्व विभागाकडून पुन्हा काम सुरू करण्यात येत आहे.

---------------

### लाडक्या बहिणींना तीन

महिला व बाल विकास विभागानं शासन निर्णय जारी करुन जुलै महिन्याच्या हप्त्यासाठी २९८४ कोटी रुपयांचा निधी वर्ग केला आहे. हा शासन निर्णय ३० जुलै रोजी जारी करण्यात आला आहे. लाडक्या बहिणींना या योजनेतून दरमहा १५०० रुपये दिले जातात. दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना येत्या दोन ते तीन दिवसात जुलै महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता वर्ग केला जाऊ शकतो. लाडक्या बहिणींना जुलै महिन्याचा म्हणजेच योजना सुरु झाल्यापासून १३ वा हप्ता मिळणार आहे.

--------

### जामखेडच्या तहसीलदारांची

(जि. गडचिरोली) येथे बदली करण्यात आली आहे. अवघ्या एका वर्षात या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची बदली झाल्याने जामखेडच्या प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या जिल्हा परिषदेच्या गटरचनेचे काम सुरु आहे. जामखेड तालुक्यात साकत, खर्डा आणि जवळा असे तीन गट असून यातील काही गटातील गावे ही दुसऱ्या गटात समाविष्ट करण्याचा आदेश 'वरून' देण्यात आला होता.परंतु सत्ताधारी असो की विरोधक त्यांच्या राजकीय आदेशापेक्षा नियमाला महत्त्व देणारे तहसीलदार गणेश माळी यांनी या आदेशाचे पालन केले नाही.यातूनचबदली करण्यात आल्याची चर्चा आहे.

------------

### भररस्त्यावर पती

केली. मात्र पत्नीने आपल्या पतीस चांगलेच धो धो धुतले. काहींनी या मारहाणीचा व्हिडिओ शुट केला व सोशल मिडीयावर टाकला. पत्नी विदर्भातील तर पती बीड मधील असल्याचे सांगण्यात येते. प्रेम करणातून या दोघांचे लग्न झाले होते. लग्नाच्या काही दिवसानंतर या दोघात तिसरी आल्याची चर्चा होत आहे. हे पती पत्नीचे भांडण शिवाजी नगर पोलीस ठाण्यापर्यंत गेले होते.

----------

### बीड जिल्ह्यात ७४टक्के शेतकऱ्यांनी

यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना , नमो सन्मान निधी , पीक विमा , पीक कर्ज , नैसर्गिक आपत्ती भरपाई , धान खरेदी , तसेच पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनांचा समावेश आहे .फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर ( सी एस सी ) जावे लागेल . यासाठी आधार कार्ड, ७/१२ किंवा ८अ उतारा आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहेत .जिल्ह्यातील धारूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८४.२१ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून , वडवणी तालुक्यात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ६२.७२ टक्के आहे . बीड , आष्टी , केज , गेवराई , पाटोदा आदी तालुक्यांमध्येही नोंदणीचे प्रमाण ७५ टक्क्यांहून अधिक आह प्रशासनाने स्पष्ट केले आहे की , शेतकऱ्यांनी जर फार्मर आयडी काढले नाही तर भविष्यात कोणतीही सरकारी मदत किंवा योजना त्यांना मिळणार नाही . त्यामुळे ही नोंदणी हक्काची आणि गरजेची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे .

cmyk



## थोडक्यात...

### पाटोद्यात नागपंचमी उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

श्रावण महिन्यातील पहिला आणि महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. नाग या प्राण्याबद्दल आदर व पूज्य भावना समाजात रुजवण्यासाठी हा सण पाळला जाण्याची परंपरा आहे.या वर्षी नागपंचमीचा सण कसा थाटात साजरा होतोय झोका. महिलांचे फेर धरुन गाणी.वारुळा भोवतो महिलाची गर्दि.बच्चे कंपनीचा पंतग.वावडी उडवणे यावर्षी नागपंचमी साजरी करण्यात आली आहे. यावर्षी नागपंचमी थाटात साजरी होत आहे.नविन लग्न झालेली नवरी या पंचमीच्या सणाला माहेरी येत असते .श्रावण महिन्यातील पहिला आणि महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. नाग या प्राण्याबद्दल आदर व पूज्य भावना समाजात रुजवण्यासाठी हा सण पाळला जाण्याची परंपरा आहे. या दिवशी घरोघरी नाग देवाची पूजा करून त्याला प्रसन्न करण्याची प्रथा आहे. वेदकाळापासून चालत आलेला हा सण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यादिवशी स्त्रिया नवीन अलंकार, वस्त्रे नेसून नागदेवताची पूजा करतात. स्त्रिया पाटावर हळद-चंदनाने नाग-नागीण आणि त्यांच्या पिल्लांची चित्रे काढून त्याला दुध, लाह्या, आघाडा, दुर्वा वाहून पूजा करतात. श्रावण महिन्यात म्हणजेच पावसाळ्यात आघाडा सर्वत्र उगवतो. या सणात या वनस्पतीला महत्त्वाचे स्थान असते. नागदेवताची पूजा करून त्याला दुध, साखर, उकडीची पुरणाची दिंड करून नैवेद्य दाखवला जातो. या सणाला विशेषत: गव्हाची खीर आणि चण्याची डाळ, गूळ यांपासून बनवलेल्या उकडीची पुरणाची दिंड तयार केली जाते.या वर्षी नागपंचमीचा सण हा थाटात साजरा होत आहे. झोका. महिलांचे फेर धरुन गाणी.वारुळा भोवतो महिलाची गर्दि.बच्चे कंपनीचा पंतग.वावडी उडवणे यावर्षी तालुक्यात पहावयास मिळत आहे



### प.पू.गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे महाविद्यालयात चरक जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्राचे जनक आयुर्वेदाचार्य आचार्य चरक ऋषी यांची ख्याती आयुर्वेदात आज सर्वजन जाणतात. त्यांनी संपूर्ण भारतवर्षाला आयुर्वेदावर आधारित अतिशय महत्व पूर्ण ग्रंथ लिहिला आज सगळीकडे तो चरक संहिता या नावाने प्रसिद्ध आहे.त्यांचे आयुर्वेदातील महत्वपूर्ण योगदान विशद करण्यासाठी परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे महाविद्यालयातील विद्यार्थी, आचार्यगण, प्राध्यापक वर्ग यांनी चरक जयंतीचे आयोजन केले होते. महाविद्यालयाच्या वतीने आचार्य चरक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. ही जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यात आयुर्वेदातील तज्ञ अनुभवी प्रतिष्ठित डॉक्टरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना आचार्य चरक यांच्या आयुष्याचा व त्यांच्या वैद्यकशास्त्रातील अमूल्य योगदानाचा आढावा देत प्रेरणादायी प्रबोधन केले व विद्यार्थ्यांना भारतीय वैद्यकीय इतिहासाबद्दल जागरूक राहून नवे संशोधन करण्याचे आवाहन करण्यात आले या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी चरक संहितेतील महत्त्वपूर्ण सूत्रांचे पठण केले आणि आयुर्वेदाची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प घेतला.

## कळंब शहरातील युवा सेनेच्या पदाधिकारी निवडी : निर्भय घुले उपशहर प्रमुखपदी

कळंब : आज कळंब शहरात युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड पार पडली. या निवड प्रक्रियेमध्ये निर्भय महादेवराव घुले यांची एकमताने युवासेना उपशहर प्रमुखपदी निवड करण्यात आली. या वेळी त्यांना पक्ष वाढीसाठी संघटनात्मक कार्य करण्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला युवासेना जिल्हाप्रमुख मनोहर आबा धोंगडे, उपजिल्हाप्रमुख संदीप पालकर, विधानसभा प्रमुख अमृत जाधव, विधानसभा समन्वयक गोविंद चौधरी यांच्यासह अनेक युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ठेवी परत मिळवण्यासाठी गृह विभागाने बोलावली बैठक

## आ.प्रकाश सोळंके यांनी केली होती मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपूर्वी बंद पडलेल्या मल्टीस्टेट, पतसंस्था व नागरी बँकांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत उपमुख्यमंत्री नामदार अजित पवार यांच्याकडे बैठकीची मागणी पत्राद्वारे केली होती याची दखल घेत गृह विभागाच्या वतीने येत्या ६ ऑगस्ट रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप सोसायटी, साईराम मल्टीस्टेट, छत्रपती मल्टीस्टेट, जिजाऊ मल्टीस्टेट, राजस्थानी सोसायटी, मराठवाडा अर्बन, मुक्ताई अर्बन, हिंदवी स्वराज्य सहकारी पतसंस्था, सामाजिक परिवर्तन सहकारी पतसंस्था, धुनकेश्वर अर्बन, जल कल्याण सहकारी पतसंस्था, मातोश्री महिला नागरी पतसंस्था या पतसंस्था मल्टीस्टेट नागरी बँकांमध्ये गैरव्यवहार होऊन बंद पडलेल्या आहेत. यामध्ये लाखो लोकांच्या हजारो करोडांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत. याबाबत आमदार प्रकाश सोळंके यांनी अधिवेशनात



देखील लक्षवेधी मांडत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देखील १७ जुलै रोजी बैठक बाबत मागणी केली होती याची दखल घेत राज्य शासनाच्या गृह विभागाने सहा ऑगस्ट २०२५ रोजी ग्रह विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित केली आहे. दरम्यान या बैठकीमुळे निश्चितच ठेवीदारांना दिलासा मिळाला असून या प्रश्नी आमदार प्रकाश यांनी मांडलेली लक्षवेधीची व पत्राची दखल शासनाने घेतली आहे.

### अरणविहीरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अरणविहीरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार २९/०७/२०२५ ह.भ.प. राम महाराज घुले,बुधबार ३०/०७/२०२५ ह.भ.प. ईश्वर महाराज नवसुपे (केडगाव), गुरुवार ३१/०७/२०२५ ह.भ.प. किशोर महाराज म्हस्के (आळंदी), शुक्रबार १/०८/२०२५ ह.भ.प. प्रांजलताई जाधव (कर्जत) शनिबार २/०८/२०२५ ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कराळे,रविवार ३/०८/२०२५ ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे, सोमवार ४/०८/२०२५ ह.भ.प. राजाराम महाराज शास्त्री (मजले चिंचोली), मंगळवार ५/०८/२०२५ ह.भ.प. गुरुवर्य बाळकृष्ण महाराज बालवडकर यांची किर्तन सेवा होणार आहे. तसेच काल्याचे किर्तन हभप गुरूवर्य बाळकृष्ण महाराज बालवडकर यांच्या हस्ते बुधवार दि ६/८/२०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन अरणविहीरा ग्रामस्थांनी केले आहे.



## राजस्थानी विद्यालयात नागपंचमी सण साजरा

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आपल्या संस्कृतीची ही माहिती व्हावी या उद्देशाने शाळेमध्ये आज नागपंचमी सणसाजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ जाजू मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ बियाळे मॅडम या होत्या तर प्रमुख वक्ते म्हणून श्री तोष्णीवाल सर व सौ चांडक मॅडम या होत्या.यावेळी प्रमुख वक्ते श्री तोष्णीवाल सर यांनी यादव काळा पासून आज पर्यंत कश्या पद्धतीने नागपंचमी सणं कसा साजरा करतात ते यावेळी सांगितले. तसेच श्रीकृष्ण व कालिया सापाची गोष्ट यावेळी विद्यार्थ्यांना सांगितली. सौ चांडक मॅडम यांनी यावेळी सुंदर असे गीत यावेळी सादर केले. प्रमुख पाहुणे सौ बियाळे मॅडम यांनी अक्कण माती चिकन माती हे सुंदर असे गीत सादर केले. यानंतर वारूळाचे पुजन करण्यात



अध्यक्षीय समारोप करताना सौ जाजू मॅडम यांनी महाभारत काळात, राजा परीक्षिताचा मुलगा, जन्मेजय याने आपल्या वडिलांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सर्प यज्ञ केला, ज्यामुळे नागांचा नाश झाला. अस्तिक ऋषींनी सर्व नागाणा मुक्त केले असे मानले जाते की श्रावण शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी नाग लोकात एक विशेष उत्सव असतो. नाग लोकांनी अस्तिक ऋषींना गुरु मानले असे प्रतिपाद सौ. जाजू मॅडम यांनी केले यावेळी मुलींसाठी झोका व झिम्मा फुगडी खेळण्याची सोय मुख्याध्यापक श्री. सोहनी सर सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लड्डा सर, बोरा सर, बियाणी सर यांनी यावेळी शाळेत केली होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ सुराणा मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री. बोरा सर यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ.राम चव्हाण यांचा निरोप समारंभ

बीड/किल्लेधारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथील राष्ट्रमाता जिजाऊ महाविद्यालयात १८ वर्षे अध्यापक म्हणून कार्य केलेले प्राध्यापक डॉ.रामराव जनार्धनराव चव्हाण यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गुरुवारी (दि.३१) निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ.चव्हाण हे गेल्या ३४ वर्षापासून अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९९२ ते २००८ पर्यंत त्यांनी किल्लेधारुर येथील राष्ट्रमाता जिजाऊ महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून कार्य केले. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणीशास्त्र प्राणीशास्त्र विभागात १८ वर्षे प्रपाठक, प्राध्यापक म्हणून सेवा केली. या काळात त्यांनी अधिसभा सदस्य, रासेयो संचालक, ग्रामीण समस्या संशोधन केंद्र, विलासराव देशमुख अध्यासन, मॉडेल कॉलेजचे प्राचार्य आदी पदांवर कार्य केले आहे. दोन महिन्यापासून मशिप्र मंडळाच्या मुक्तानंद महाविद्यालयात प्राचार्यपदी कार्यरत आहेत. विद्यापीठातून त्यांनी धारणाधिकार घेतला आहे. विद्यापीठाच्या सेवेतून ते (दि.३१) जुलै रोजी निवृत्त होत आहेत. या निमित्त मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले सभागृहात निरोप समारंभ घेण्यात येईल. यावेळी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. तत्पूर्वी प्राणीशास्त्र विभागातही सकाळी ११ ते १ या दरम्यान विभागातर्फे निरोप समारंभ घेण्यात येणार आहे., असे विभागप्रमुख डॉ.सुनिता बोर्डे यांनी कळविले आहे.



## पान ६ वरून...

### जनतेच्या प्रश्नासाठी

संबंधित प्रकरणांचे तातडीने निपटारा करून शेतकऱ्यांना व नागरिकांना योग्य निर्णय मिळवून दिला जाईल. ७ ऑगस्ट रोजी '' एम सॅन्ड धोरण '' ( कृत्रिम वाळू )आणि अंमलबजावणी याबाबत नवे मानक धोरण जनतेसमोर मांडले जाईल . यानंतर महसूल सप्ताहाचा समारोप होईल.या सर्व कार्यक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी , अधिकारी , ग्रामसेवक , तलाठी व सर्व संबंधित विभाग सहभागी होणार आहेत . विशेष म्हणजे यावेळी लघुपट तयार करून समाजमाध्यमांतून जनजागृती केली जाणार आहे . जिल्हाधिकारी कार्यालयांनी सर्व कार्यक्रमांचे फोटोंसह अहवाल शासनाला सादर करावेत , असेही निर्देश आहेत. सध्या बीड जिल्ह्यात अनेक चांगले महसूल अधिकारी काम करत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक नागरिकांच्या समस्या ऐकून घेतात . तात्काळ संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , अगदी मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांना बोलवून ते नागरिकांची कामे जलद गतीने कशी होतील , याकडे लक्ष देतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या सुद्धा शेतकऱ्यांप्रती कनवाळू भूमिकेतून बघतात . विनाकारण कोणालाही त्रास होऊ नये , यासाठी त्या नेहमी बैठकांमध्ये सूचना देत असतात. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार गेल्यापासून अनेक नवोपक्रम राबविले आहेत . सुरुवातीस त्यांनी प्रत्येक मंडळात बैठका घेतल्या . स्थानिक अधिकारी , कर्मचारी शेतकरी यांच्या समस्या जाणून घेऊन तेथेच निर्णय देण्याचा सपाटा सुरू केला . त्यांच्या कार्यकाळात अनेक रस्ते मोकळे होत आहेत . प्रत्येक गोष्ट समजावून सांगणारे असे तहसीलदार आम्ही बघितले नाहीत , अशी सामान्य शेतकऱ्यांची भावना आहे . स्थानिक पातळीवर मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी सुद्धा शासनाच्या विविध योजना उदाहरणार्थ छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान , शिवपानंद रस्ते काढून देणे , जिवंत सातबारा मोहिमा राबविणे इत्यादी कामे वेगाने करीत आहेत. महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागाच्या विविध कामांमध्ये पारदर्शकता आणण्याचा आणि लोकांच्या थेट सहभागातून त्यांचा विश्वास संपादन करण्याचा शासनाचा हा प्रयत्न आहे . बीड जिल्हा यात नक्की अग्रेसर राहील यात शंका नसावी.

### लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

मा.आ.राधाकृष्ण होके पाटील , मा.आ. डी.के. देशमुख, मोहनराव जगताप, बाबुराव पोटभरे , ओमप्रकाश शेटे, जयसिंग सोळंके , जयदत्त नरवडे,सचिन उजगरे, उमेश काका मोगरेकर,प्रा.अर्जुन तनपुरे, नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी मोरे , सहाल भैय्या चाऊस, नानासाहेब घोडके, प्रभाकर साळेगावकर ,धम्मानंद साळवे, अरुणराव राऊत ,अविनाश तात्या जावळे , डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले ,डॉ. प्रकाश आनंदगावकर, दयानंद स्वामी , शिवाजी सुतार, डॉ. दिनकर मस्के अरुण इंगळे, कचरु तात्या खळगे, मनमोहन कलंत्री ,कॉ. दत्ता डाके, तुकाराम येवले ॲड. तथागत कांबळे , मोहन जाधव ,गंगाभिषण थावरे,भिमराव नाडे,आंकुश जाधव,अजय शिंदे,विजय दादा साळवे,ॲड. नारायण गोले,भारत तांगडे ,ॲड. डोंगरदिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मानवी हक्क अभियान च्या सर्व कार्यकर्ते, समाज बांधवांनी या सोहळ्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक रमेश गवळी यांनी माध्यमाद्वारे केले आहे.

### कृषि खात्याकडून माजलगाव

आले.यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी कृषी केंद्राच्या संचालकांना विविध सूचना केल्या तसेच यापुढे कुठलाही गैरप्रकार दिसून आल्यास कठोर कार्यवाही करण्याचे संकेत संबंधित अधिकारी यांनी दिले.यावेळी उपस्थित कृषी विभागाचे सर्व अधिकारी,शेतकरी कामगार पक्षाचे भाई ॲड.नारायण गोले पाटील,ॲड बाबासाहेब घोडे,परमेश्वर डाके यांची उपस्थिती होती.

### खतविक्रेत्यांना

नवीन १ सिक्युरिटी ई-पॉस मशीन त्वरित प्राप्त करा:

ज्या खत विक्रेत्यांनी अद्याप नवीन १ सिक्युरिटी ई-पॉस मशीन प्राप्त केलेले नाहीत, त्यांनी तात्काळ जिल्ह्यातील कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून १० ऑगस्ट २०२५ पूर्वी हे मशीन प्राप्त करून कार्यान्वित करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना शेतकऱ्यांसाठी ठरत आहे वरदान

### योजनेचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी प्रगती साधावी, कृषी विभागाचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी खरिप व रब्बी हंगामातील अन्नधान्य व व्यापारी पिकांबरोबरच फळबागेवरही लक्ष केंद्रीत करावे. शासनाने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फळलागवड करुन उत्पन्न मिळवावे यासाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लावगड ही शंभरटक्के अनुदान असणारी महत्वकांक्षी योजना सुरु केली आहे. या योजनेतून लाभ घेत प्रगती साधावी असे आवाहन आष्टीी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

राज्य सरकारमार्फत सुरु करण्यात आलेल्या योजनेची अंमलबजावणी कृषी विभाग करतो. लाभार्थी शेतकऱ्यांना पहिल्यावर्षी ५० टक्के तर दुसऱ्या वर्षी ३० व तिसऱ्या वर्षी



लाभासाठी शेतकऱ्यांनी असा करावा अर्ज

आपले सरकार डीबीटी पोर्टलव्दारे भाऊसाहेब फुंडकर फळलागवड योजना, नवीन अर्जदार नोंदणी बटनवर क्लिक करुन शेतकऱ्याचे नाव, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, ईमेल व संपूर्ण पत्त इत्यादी माहिती प्रविष्ट करावी. वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्ड तयार केल्यानंतर आपली प्रोफाईल शंभरटक्के पूर्ण करण्यासाठी प्रक्रिया पुर्ण करावी. वैयक्तिक तपशील, आणि जमिनीची माहिती असणारा तपशिल प्रविष्ट करुन फॉर्म भरावा त्याच प्रमाणे आकारण्यात आलेली शुल्क देखील भरावी.

२० टक्के या प्रमाणे १०० टक्के अनुदानाचे वाटप केले जाते. किमान २० गुंठे जमिन क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना सदरील योजनेचा लाभघेता येईल. यासाठी शेतकऱ्याने फार्मर आयडी काढलेले असणे बंधनकारक आहे. अल्पभुधारक शेतकरी, महिला शेतकऱ्यांना या योजनेत विशेष प्राधान्य देण्यात येते. जास्तीत जास्त ६ हेक्टर जमिनीवर शेतकरी फळ लागवड करु शकतात. जे शेतकरी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड करतात त्यांना त्यांचे सदरील क्षेत्र वगळता इतर क्षेत्रावर या योजनेचा लाभ घेता येतो. आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमात शेतकरी फळझाड लागवडीकडे शेतकरी वळाले असून योजनेचा लाभ घेत आहेत. यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी दुष्काळजन्य स्थितीतही वरदान ठरत आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४२०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २३/०७/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : अत्तास हबीब अब्दुल्ला २) अमीना अब्दुल्ला हबीब ३) सलमा अब्दुल्ला हबीब सिटी सर्व्हे नं.१३०९ चे हस्तांतर करणेबाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्यांद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही. वरील सदर मालमत्तेची

चतुः सिमा
पुर्व - फैसल मुबारक बिनमाजी यांचे घर
पश्चिम : सरकारी रोड
दक्षिण : आमरान बाशन यांचे घर
उत्तर : शेख शरफोद्दीन

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

दिनांक: ३०-०७-२०२५

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, वित संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक चंद्रकला अरूण कारगुडे या आहेत.

चंद्रकला अरूण कारगुडे यांनी प्लॉट नं. १७ व प्लॉट क्र.१८ पैकी, क्षेत्र २००० चौ. फुट म्हणजेच १८५.८७ चौ.मी. बीड न.प.घर क्र.१-५-९१९, शहर भुमापन क्र. १४२६ पैकी, अशी ज्ञिळकत खरेदीखत नं. ३१५४/२०२० दि.०१-१०-२०२० अन्वये खरेदी केलेली आहे.

चंद्रकला अरूण कारगुडे या सदर बीड नगर परिषद घर क्र.१-५-९१९ रेखा महेश वाघमारे यांना विक्री करण्याचे ठरलेले आहे व सदर मिळकती बाबतचे पुर्वीचे मालकीचे संलग्न मुळ खरेदीखते क्र. १९९/१९९९ दि.२२-०१-१९९९ व खरेदीखत नं. १६९०/२००३ दि.१२-०६-२००३ मुळ पावतीसह दि.२६-०७-२०२५ रोजी नगर नाका ते शिवाजी महाराज चौक प्रवासा दरम्यान रेखा महेश वाघमारे यांचेकडून गहाळ झालेल्या असून, त्यांनी पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, बीड येथे हरवलेल्या मालमत्ते बाबत ०४७७/२०२५ दि.२९-०७-२०२५ रोजी फिर्याद दिलेली आहे.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले संलग्न खरेदीखत क्र. १९९/१९९९ दिनांक २२-०१-१९९९ व खरेदीखत नं. १६९०/२००३ दि.१२-०६-२००३ मुळ पावतीसह ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील **मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र.१-५-९१९ (नवा), शहर भुमापन क्र. १४२६ पैकी, क्षेत्रफळ २००० चौ. फुट म्हणजेच १८५.८७ चौ.मी.सर्व्हे नं.६७ तरफ गिराम, श्रीराम नगर, बीड, ता. जि. बीड, ज्याची चतुः सिमाः-**

**पूर्वेस : १० फुट रूंदीचा रस्ता पश्चिमेस : थापडे यांचे घर**
**दक्षिणेस : देशमुख यांचे घर**
**उत्तरेस : घोरड यांचे घर**
**सदर मिळकत खरेदी करणारे :**
**रेखा महेश वाघमारे, रा. बिंदुसरा कॉलनी, कॅनल रोड बीड**

मार्फत : ॲड.एस. आर.राजपत, बुंदेलपुरा, बीड, मो.नं. ९०७५५४५९३२

जाहीर नोटीस देणार
रेखा महेश वाघमारे
रा . बिंदुसरा कॉलनी, बीड

**मा.श्रीमती. एस.डी.सोनी, साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज ११८४/२०२५

अजय दादासाहेब काशीद विरूध्द निरंक

अर्जदार १) अजय पि. दादासाहेब काशिद, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. साक्षाळपिंप्री, ता.जि. बीड २) विजय पि. दादासाहेब काशिद, वय १९ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ३) लक्ष्मण पि. तुळशीराम काशिद, वय ८० वर्षे, धंदा निरंक, रा. सदर ४) सौ. अनुसया भ्र. लक्ष्मण काशिद, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर.

विरुध्द निरंक

**मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत दादासाहेब लक्ष्मण काशिद, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत दादासाहेब लक्ष्मण काशिद, यांचा मृत्यु दिनांक १०/०७/२०१७ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत दादासाहेब लक्ष्मण काशिद, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत दादासाहेब लक्ष्मण काशिद, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/ ०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३०/०८/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

स्वाक्षरीत
कनिष्ठ लिपिक

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१३० दिनांक-२४/०७/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणेश मोहण कांबळे रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जान्हवी गणेश कांबळे | मुलगी | २१/११/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरीत
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६३/२०२५
तुकाराम पि-काशिनाथ धोंडकर विरुध्द ग्रा.पं. कार्या. आहेर वडगाव
पहा
१. तुकाराम पि.काशिनाथ धोंडकर , रा. आहेरवडगाव ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत बबईबाई भ्र. काशिनाथ धोंडकर यांचा दिनांक-२३/०५/२०१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहेरवडगाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेरवडगाव ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/०७/ २०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०८/२०२५ ही आहे.

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड.

cmyk




# पीक विमा योजनेत चार मोठे बदल, बळीराजा हिरमुसला

## फक्त २० टक्के शेतकऱ्यांनी इन्शुरन्स घेतला

राज्यातील शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेकडे पाठ फिरवली असल्याचे चित्र बघायला माळले आहे. पिक विमा भरण्याची मुदत संपायला आली तरी राज्यात केवळ २० ते २२% शेतकऱ्यांनी पिक विमा भरल्याची माहिती समोर आली आहे. तर परभणीत मी पिक विमा भरणार नाही अशी चळवळच शेतकऱ्यांनी चालू केली आहे.

राज्य सरकारने दोन वर्ष एक रुपयात पिक विमा देण्याची योजना सुरू ठेवल्यानंतर यावर्षी सरकारनं ही योजना बंद करून नव्याने पंतप्रधान पीक विमा योजना आणली. मात्र ज्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्याचं चित्र आहे. पीक विमा भरण्याची मुदत संपत आली तरीही केवळ राज्यात १ कोटी २७ लाख ३९ हजार २५७ हेक्टर पैकी केवळ ३६ लाख ५४ हजार हेक्टर एवढ्याच क्षेत्राचा विमा २९ जुलै पर्यंत काढण्यात आला आहे. म्हणजेच ज्याची टक्केवारी २० ते २२ टक्के एवढ्या शेतकऱ्यांनीच पीक विमा भरला असल्याचे समोर आले आहे.पीक विमा योजनेत चार मोठे बदल, बळीराजा हिरमुसला . दरम्यान, पुढे आलेल्या माहितीनुसार, शासनाने या योजनेत अनेक बदल केल्याने शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरवली आहे. परभणीत तर काही शेतकऱ्यांनी मी पीक



विमा भरणार नाही अशी चळवळ सुरू केली आहे. नवीन योजनेत ४ ट्रिगर कमी केले आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांनी पिक विमा भरणे बंद केल्याचे शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे . ज्यामध्ये पावसाभावी पेरणी झाली नाही तरी विमा मिळण्याची तरतूद होती. हंगामातील प्रतिकूल परिस्थिती २५% अग्रीम रक्कम बंद केली तसेच स्थानिक आपत्ती म्हणजेच उभ्या पिकात पावसाने नुकसान झाले तर पिक विमा मिळत होता. यासह काढणी पश्चात नुकसान म्हणजेच वैयक्तिक नुकसान भरपाई मिळत मिळत होती. हे महत्वाचे मुद्दे यासाठी कारणीभूत ठरले आहे. दोन वर्ष १ रुपयात विमा भरल्यानंतर आता एवढा भरावा लागतोय विम्यासाठी प्रीमियम

सोयाबीन ११६० रुपये प्रती हेक्टर, कापुस १०५० रुपये प्रती हेक्टर तुर ९०० रुपये प्रती हेक्टर

कांद्याच्या प्रश्नावरून नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यलयात मोठा गोंधळ : कांद्याच्या प्रश्नावरून नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यलयात मोठा गोंधळ उडाला. कांद्याला हमी भाव द्यावा चाळीत खराब होणाऱ्या कांद्याला विमा संरक्षण द्यावे, निर्यातीला अनुदान द्यावे यासह विविध मागण्यांसाठी कांदा उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून नाशिकचे कांदा उत्पादक शेतकरी जिल्हाधिकारी कार्यलयात दाखल झाले. जिल्हाधिकारी रजेवर असल्याने शेतकर्यांनी जिल्हाधिकारी कार्यलाय बाहेरच ठिय्या मांडत कांदा फोडून आपला निषेध व्यक्त केला. त्यानंतर आंदोलकांना निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्याकडे पोलीस घेऊन जात असताना शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यलायच्या भिंतीवर कांदा फोडत प्रशासनाचा निषेध केल्यानं गोंधळात आणखी भर पडली. त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनाबाहेर ठियाय मांडत कांदा पोळी कांदा भाकरी भाजी खात सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सकाळ पासून मोठा फौज फाटा तैनात असताना देखील शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे पोलिस यंत्रणा गाफील राहिल्याचे निदर्शनास आले.

# रासायनिक शेतीची सुरवात व दुषपरिणाम

जर्मन रसायनशास्त्रज्ञ जस्टस लेबिग यांनी नत्र, स्फुरद आणि पालाश या त्रिसूत्रीचा शोध लावला. सन १९०५ मध्ये फ्रिट्?झ हेबर या शास्त्रज्ञाने हवेतील नायट्रोजनपासून अमोनिया वायू तयार केला. १९१५ मध्ये कार्ल बॉश या शास्त्रज्ञाने कृत्रिम अमोनिया तयार केला. त्याच अमोनियाने पहिल्या महायुद्धात कैसरच्या लढाईमध्ये सुमारे आठ लाख लोकांचा बळी घेतला. युद्ध संपल्यावर मग पिकाची वाढ करण्यासाठी तो शेतकऱ्यांना पुरवायला सुरवात झाली. नंतर पुन्हा आय. जी. फ्राबेन या कंपनीने दुसऱ्या महायुद्धात लोकांना मारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अमोनियाची निर्मिती केली.

महायुद्धाच्या शेवटी या वायूची निर्मिती करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांचा हा अमोनिया, तसेच युद्धभूमीवर डास, माश्या, चिलटे मारण्यासाठी तयार केलेली डी.डी.टी. शेतीकडेच वळविण्यात आली. रासायनिक खतांनी रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेल्या पिकांवर नवनवीन किडींचा प्रादुर्भाव वाढू लागला. या किडींच्या नियंत्रणासाठी क्लोरडेन, डेल्ड्रीन, एन्ड्रीन, पॅराथिऑन, मॅलेथिऑन यांसारख्या कीडनाशकांची निर्मिती झाली. खते, कीडनाशके, बियाणे, अवजारे, तणनाशके ही आधुनिक शेतीची तंत्रे होती. ही तंत्रे शेतकऱ्याने स्वीकारण्यासाठी अधिक उत्पादनाचे आमिष दाखविण्यात आले. सुरवातीला या तंत्राचे परिणामही तसेच होते. त्यामुळे शेतकरी ते स्वीकारू लागले. त्यासाठी शेतकरी बँका व या तंत्रांचे उत्पादक यांच्याकडून कर्जही स्वीकारू



लागले. अनुदान, कर्जामध्ये गुंतली शेती, आधुनिक तंत्रे, अनुदान, कर्ज यांनी अमेरिकन शेतकरी, सरकार यांच्यावर जणू ताबा मिळविला. त्यानंतर कंपन्यांची दृष्टी अधिक फायद्यासाठी तिसऱ्या जगाकडे वळली. जागतिक बँक व अमेरिकी सरकारने ही तंत्रे स्वीकारण्यासाठी भारतावर दडपण आणले. त्यासाठी प्रचंड पैसा पुरविण्यात आला. त्याच सुमारास भारतात दुष्काळाने थैमान घातल्याने भारत सरकारने जनतेचे पोट भरण्यासाठी या सर्वांचा स्वीकार केला. अनुदान, कर्ज या आकर्षक वेष्टनांतून आलेल्या कीडनाशकांचा भारतातील वापर झपाट्याने वाढू लागला. १९६६ पासून १९७८ पर्यंतच्या अवघ्या १२ वर्षांत रासायनिक खतांचा वापर एक दशलक्ष टनांपासून ५० दशलक्ष टनांपर्यंत वाढला. हेक्टरी खतांचे प्रमाण ३.५ किलोपासून ५० किलोपर्यंत वाढले. नंतर १९५० पासून २००१-०२ मध्ये हे प्रमाण १७० पटींनी वाढले. रासायनिक कीडनाशकांच्या वापराचे प्रमाण १९७१ ते १९९४-९५ पर्यंत १०० टक्क्यांनी वाढले. या वाढत्या खर्चाबरोबर दुर्दैवाने शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनामध्ये तेवढी वाढ झाली नाही. अतिप्रमाणात वापरलेली रासायनिक खते, कीडनाशकांनी नापीक झालेली जमी न आणि शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा ही मुख्य कारणे यामागे आहेत. १९७७ मध्ये कर्नाटकमधील मालनाड येथे घडलेली घटना ''हंडी सिंड्रोम' या नावाने प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यात भातासाठी मोठ्या प्रमाणात कीडनाशके वापरली जात. पिकावर फवारलेली कीडनाशके पाण्याबरोबर खालच्या शेतांमध्ये जात होती. या शेतांमधील खेकडे खाल्ल्याने सुमारे २०० मजुरांना पॅरालिसीस दिसून आला. खेकड्यांच्या शरीरात भातासाठी वापरलेल्या कीडनाशकांचे अंश सापडले. असे खेकडे या मजुरांनी खाल्ल्यामुळे त्यांच्यावर हा परिणाम झाला होता.

जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमाप्रमाणे माणसाच्या शरीरात जास्तीत जास्त १.२५ पीपीएम एवढ्या प्रमाणात डी.डी.टी.चे अंश सापडले, तर फारसा त्रास होत नाही. पण दिल्लीमध्ये केलेल्या चाचणीत या शहरातील नागरिकांच्या चरबीमध्ये सुमारे २० पीपीएम एवढे डी.डी.टी.चे अंश सापडल्याचा अहवाल ''डाऊन टू अर्थ' या मासिकात प्रसिद्ध झाला. पंजाबमध्ये हरितक्रांतीचा उच्चांक साधला गेला. आज पंजाबमधील भटिंडा जिल्ह्यातून गंगानगर येथील कर्करोगावर उपचार करणाऱ्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी कर्करोगाने आजारी रुग्ण रोज एक रेल्वेगाडी भरून जातात. दुर्दैवी गाडीचे नाव ''कॅन्सर एक्स्प्रेस' असे लोकांनी ठेवले आहे. हे सर्व टाळण्यासाठी गरज आहे सेंद्रिय शेतीची व्? पर्यावरण सांभाळण्याची.

# मासेमारी जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व




जगभरातील मत्स्यपालनाचा सामान्य इतिहास असे दर्शवितो की शोषणामध्ये हळूहळू वाढ झाली आहे, काही अंशी जमीन जवळ असलेल्या शोषणाच्या साठ्यात वाढ झाली आहे आणि काही अंशी मासेमारीच्या अधिक प्रयत्नांना दूरवरच्या मासेमारीच्या जागेपर्यंत वाढविल्यामुळे जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. माशांच्या जाळीच्या नियमनाचा सैद्धांतिक आधार ''इष्टतम कापणी रणनीती'' च्या संकल्पनेवर आधारित आहे, बर्याच व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या माशांच्या प्रजातींसाठी, भरती मोठ्या प्रमाणात साठा हे आकारात साठा आकाराशी संबंधित नाही. यामुळे परिपूर्णतेची पर्वा न करता, आयुष्यभर प्रत्येक वर्षाच्या शोषणासाठी इष्टतम () शोषणाच्या पद्धतीची कल्पना करणे शक्य करते.मासे पकडण्याची शक्यता असलेल्या संभाव्य वयाशी संबंधित विचार करता जसे की जेव्हा ते लहान असतात तेव्हा मासे पकडले जातात. जास्त प्रमाणात पकडल्याने लहान आकारातील मासे भविष्यातील माशांच्या उत्पादनाच्या शाश्वत विकासावर परिणाम करतात. याउलट, मासे फार म्हातारे होईपर्यंत पकडले गेले नाहीत तर त्या तुलनेने मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. सैद्धांतिक दृष्टिकोन म्हणजे मासेमारीत दरवर्षाच्या वजनातील टिकाऊ उत्पन्न जास्तीत जास्त मिळविण्यासाठी कोणते सर्वोत्तम वय किंवा आकार घ्यावा हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. हे साध्य करण्याचे अनेक मार्ग आहेत आणि त्यापैकी एक म्हणजे प्रथम कॅप्चरचे वय (किंवा आकार) थेट नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, जाळीच्या नियमांचा एक उद्देश दीर्घकालीन टिकाऊ उत्पादनावर परिणाम करणे होय. इतर उद्दीष्टे म्हणजे किशोर माशांना पकडण्यापासून वाचविणे आणि पुरेशी मासे परिपक्व राहतील याची खात्री करण्याचा प्रयत्न करणे. हे विशेषत: अशा पातळीवर शोषण करणार्या समभागांसाठी महत्त्वाचे असू शकते कारण कमी झालेल्या साठामुळे भरती अयशस्वी होण्याचा धोका आहे.


# टोमॅटो फळ पोखरणारी अळी नियंत्रण

टोमॅटो पिकातील फळ पोखरणाऱ्या अळी याविषयी सविस्तरपणे माहिती घेण्याची गरज आहे. कारण या अळीमुळे मोठे नुकसान होते. यामध्ये ही अळी नेमकी काय आहे, तिचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, तिचा प्रसार कसा होतो, तिची लक्षणे काय आहे आणि या अळीच्या नियंत्रणसाठी कोणती औषधे आहेत याबद्दल माहिती असल्यास त्यावर नियंत्रण करणे सोपे होते.

अंडी, अळी, कोष आणि प्रौढ, अशा अळीच्या साधारणतः चार अवस्था असतात. अंडी पिवळसर रंगाची असतात. अळी सुरवातीला हिरव्या रंगाची असते. नंतर ती तपकिरी रंगाची होते. अंगावर राखाडी किंवा पांढऱ्या रंगाच्या रेषा असतात. कोष हा तपकिरी रंगाचा फळांच्या अवशेषात किंवा जमिनीत आढळतो. पतंग फिकट पिवळसर किंवा फिकट हिरव्या रंगाचा असतो. जीवनक्रम २५-३० दिवसात पूर्ण होतो. ही जवळजवळ १५८ पिकावर उपजीविका करते. उदा टोमॅटो, मिरची, भेंडी, कोबी वर्गीय पीके, वाल आणि घेवडा इत्यादि.

आर्थिक नुकसान पातळी : एक अळीचा पतंग प्रति मीटर रांगेत किंवा २ टक्के नुकसान होते. एक अळी ही २ ते ८ फळांचे नुकसान करू शकते. जवळपास ही कीड ७०-८० टक्के नुकसान करते. टोमॅटो पिकात अळी अवस्थेतील किड शेंड्यांची किंवा रोपांची पाने खाते. नंतर टोमॅटो अपरिपक्व अथवा पक्व किंवा लहान फळांना बीळपाडते. टोमॅटो फळात विष्ठा टाकतात त्यामुळे टोमॅटो फळे खराब होतात, सडतात व त्यावर बुरशीजन्य रोगाची वाढ





होऊन पिकात रोगाची लागण होते.

उपाययोजना : पुनर्लागवड वेळी मुख्य पिकाच्या कडेने मका आणि चवळी लावावी. तसेच झेंडू लावावा. लागवडीनंतर ४०-४५ दिवसांनी शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस हे मित्रकीटक १ लाख प्रतिहेक्टर या प्रमाणात ७ दिवसांच्या अंतराने २-३ वेळा सोडावे. हे कीटक फळे पोखरणाऱ्या किडीची अंडी शोधून त्यात स्वतःची अंडी घालतात. परिणामी फळे पोखरणारी कीड अंडी अवस्थेतच नष्ट होते. फळे पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी त्यांना रोगकारक ठरणाऱ्या विषाणू चां वापर करता येतो. हेलीकोव्हर्पा न्यूक्लिअर पॉलिहायड्रॉसीस व्हायरस (एचएएनपीव्ही) १ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे उन्हे कमी झाल्यानंतर संध्याकाळी फवारणी करावी. ५ टक्के निंबोळी अर्क किंवा कडूनिंब आधारित अॅझाडिरेक्टीन (३००० पीपीएम) २ मि.लि प्रतिलिटरप्रमाणे फवारणी करावी. बी. टी. जीवाणूजन्य कीटकनाशक २ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. शेतात एकरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे लावावे.

वेळोवेळी किडलेली फळे काढून खोल खड्ड्यात गाडून टाकावीत.

रासायनिक नियंत्रण : १. क्लोरएन्ट्रानिलिप्रोल १८.५ एससी -०.३ मिली (कोराजन, एफएमसी)

२. सायान्ट्रानिलीप्रोल १०.२६% ओडी - १.८ मिलि (बेनेव्हीया, एफएमसी)

३. फ्लुबेन्डामाइड २०% डब्ल्यूडीजी - ०.५ ग्राम (टाकुमी, टाटा)

४. इंडोक्झाकार्ब १४.५% एससी - ०.८ मिलि (किंगडोक्सा,घरडा केमिकल्स)

५. क्विनालफॉस २५ ईसी - २ मिलि (धानुलक्स, धानुका)

या पैकी कोणतेही कीडनाशक आलटून पालटून किडीचा प्रादुर्भाव अनुसार प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी :

रसशोषक किडींचा उद्रेक टाळणे, किडींमध्ये कीटकनाशकांप्रती प्रतिकारक क्षमता वाढीस लागू नये, तसेच फवारणी करणाऱ्या व्यक्तीस विषबाधा होऊ नये, इ. साठी खालील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे. पीक वाढीच्या सुरुवातीच्या ६० दिवसांपर्यंत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये.

एकाच वेळी एकापेक्षा अधिक कीटकनाशकांचे मिश्रण करून फवारू नये.

त्वचेला हानी, इजा होऊ नये म्हणून कीटकनाशके उघड्या हाताने हाताळू नयेत. हात मोज्यांचा वापर करावा. श्वासाद्वारे शरीरात जाऊन विषबाधा होऊ नये यासाठी फवारणी करताना नाक आणि तोंडाला मास्क लावावा.

फवारणीचे तुषार/शिंतोडे डोळ्यात गेल्यास गंभीर इजा होऊन दृष्टी जाऊ शकते. त्यामुळे डोळ्यांना गॉगल किंवा संरक्षक हूड लावावे. विषबाधेची लक्षणे दिसताच त्वरित उपचार करून घ्यावेत.




### महत्वाच्या घटना

१४९८ : पश्चिम गोलार्धात तिसरा प्रवास करताना ख्रिस्तोफर कोलंबस हे त्रिनिदाद बेटांचा शोध लावणारे पहिले युपोपीय ठरले.
१६५७ : मुघलांनी विजापूरचा कल्याणी किल्ला जिंकला.
६५८ : औरंगजेब मुघल सम्राट बनला.
१८५६ : न्यूझीलंडची राजधानी ख्राइस्टचर्चची स्थापना
१९३३ : महात्मा गांधी यांनी साबरमती आश्रम सोडला.
१९३७ : के. नारायण काळे यांनी दिग्दर्शित केलेला 'वहाँ' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईतील 'मिनर्व्हा' टॉकीजमधे प्रदर्शित झाला.
१९४८ : भारतात कलकत्ता शहरात प्रथम राज्य सेवा परिवहनाची स्थापना करण्यात आली.
१९५४ : इटालियन गिर्यारोहकांनी के-२ (मांऊंट गॉडविन ऑस्टिन) हे जगातील दुसर्या क्रमांकाचे शिखर प्रथमच सर केले.
१९५६ : कसोटी सामन्यातील एका डावात सर्व १० गडी बाद करण्याचा विक्रम करणारा जिम लेकर हा पहिला गोलंदाज बनला. या कसोटी सामन्यात त्याने १९ बळी घेतले.
१९८२ : सोवियत संघाने आण्विक चाचणी केली.
१९६४ : रेंजर ७ अंतराळ यानाने चंद्राचे पहिले स्पष्ट छायाचित्रे काढले.
१९९२ : जॉर्जियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९२ : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय सतारवादक पं. रविशंकर यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
२००० : वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर आणि प्रगत तंत्रज्ञान केंद्राचे डॉ. डी. डी. भवाळकर यांना एच. के फिरोदिया पुरस्कार जाहीर
२००१ : समाजात मूलभूत स्वरुपाची क्रांतिकारक जडणघडण करण्यासाठी झटणार्या व्यक्तींना देण्यात येणारा 'राजर्षी शाहूमहाराज समता पुरस्कार' दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर
२००६ : फिदेल कॅस्ट्रो यांनी आपल्या भावाला, राऊल यांच्याकडे सत्ता हस्तगत केली.
२०१२ : मायकेल फेल्प्स यांनी ऑलिम्पिकमध्ये जिंकलेल्या सर्वाधिक पदक जीकाण्याचा विक्रम मोडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०४ : गॅब्रिअल क्रॅमर स्विस गणिती (मृत्यू: ४ जानेवारी १७५२)
१८०० : फ्रेडरिक वोहलर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ सप्टेंबर १८८२)
१८७२ : लक्ष्मण रामचंद्र पांगारकर संतसाहित्याचे अभ्यासक, चरित्रकार व गाथा संपादक (मृत्यू: १० नोव्हेंबर १९४१)
१८८० : धनपतराय श्रीवास्तव ऊर्फ 'मुन्शी प्रेमचंद' हिन्दी साहित्यिक. त्यांनी १५ कादंबर्या व ३०० कथा लिहील्या. त्यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. (मृत्यू: ८ आक्टोबर १९३६)
१८८६ : फ्रेड क्बिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (मृत्यू: १६ सप्टेंबर १९६५)
१९०२ : केशवा तथा के. शंकर पिळ्ळे व्यंगचित्रकार व लेखक, भारतातील राजकीय व्यंगचित्रांचे जनक, पद्मविभूषण (१९७६), 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट' आणि 'शंकर्स इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम' यांचे संस्थापक (मृत्यू: २६ डिसेंबर १९८९)
१९०७ : दामोदर धर्मानंद कोसंबी प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (मृत्यू: २९ जून १९६६)
१९१२ : मिल्टन फ्रीडमन नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: १६ नोव्हेंबर २००६)
१९१८ : डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर संस्कृत पंडित (मृत्यू: १० एप्रिल २०००)
१९१९ : भारतीय क्रिकेटपटू हेमू अधिकारी यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर २००३)
१९४१ : अमरसिंग चौधरी गुजरातचे मुख्यमंत्री (मृत्यू: १५ ऑगस्ट २००४)
१९५४ : भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक मनिवंनान यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून २०१३)
१९६५ : जे. के. रोलिंग हॅरी पॉटर मुळे प्रसिद्ध झालेल्या इंग्लिश लेखिका
१९९२ : आहारतज्ज्ञ श्रेया आढाव यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५० : जॉन (पाचवा) पोर्तुगालचा राजा (जन्म: २२ आक्टोबर १६८९)
१८०५ : भारतीय सैनिक धीरान चिन्नमलाई यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १७६५)
१८६५ : जगन्नाथ ऊर्फ 'नाना' शंकरशेठ दानशूर व शिक्षणतज्ञ, आधुनिक मुंबईचे शिल्पकार (जन्म: १० फेब्रुवारी १८०३)
१८७५ : अँड्र्यू जॉन्सन अमेरिकेचे १७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २९ डिसेंबर १८०८)
१९४० : भारतीय कार्यकर्ते उधम सिंग यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १८९९)
१९६८ : शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (जन्म: १९ सप्टेंबर १८६७)
१९८० : मोहम्मद रफी पार्श्वगायक, पद्मश्री (जन्म: २४ डिसेंबर १९२४ कोटला सुलतान सिंग, पंजाब)
२०११ : रोमन कॅथोलिक चर्चचे धर्मगुरू जोसेफ अल्बर्ट रोजारियो यांचे निधन.
२०१४ : भारतीय पत्रकार आणि लेखक नबरुण भट्टाचार्य यांचे निधन. (जन्म: २३ जून १९४८)

# मोकाट जनावरां मुळे अपघात होण्याची शक्यता

## जनावरांच्या मेन रोड वर मधुमद बसण्यामुळे वाहतूकीस अडथळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील मेन रोड यशवंतराव चौक राजीव गांधी चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक व सावरकर चौक बस स्थानका कडे नेहमी वाहतूक वर्दळीच्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे वावरतात त्यामुळे रस्त्यावरून जाताना लहान मुले महिला पुरुष यांना खूप त्रास होतो. मोकाट जनावरे हे रस्त्याच्या मधोमध उभे राहतात तर कधी कधी रस्त्याच्या मधोमध बसतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. मोकाट जनावराच्या कधीकधी झुंजही लागतात त्यामुळे महिला , पुरुष , शाळकरी मुलांना रस्त्यावरून जाताना जीव मोठी धरून चालावे लागते. रस्त्यावरील जनावरामुळे वाहतूक व्यवस्थेस खूप मोठी अडचण होते .

तरी या जनावरचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्या त टाकावे अशी मागणी नागरिक करत आहेत.सविस्तर वृत्त असे की अंबाजोगाई शहरांमध्ये प्रत्येक रस्त्यावर प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट



जनावरांचा जास्त प्रमाणात जमावं होतो आहे या जनावराच्या जमावंमुळे सर्वसामान्य नागरिक, शाळकरी मुले महिला यांना खूप त्रास होतो कधी कधी भर रस्त्यावर जनावरांची झुंज लागते यामुळे शाळकरी मुलांना आपला जीव मुठीत घेऊन ये जा करावी लागते. मोकाट जनावरे भर रस्त्यावर बसतात यामुळे वाहतुकीची अडचण होते. अंबाजोगाई शहरातील मोंढा मार्केट मंगळवार आठवडी बाजार रविवार शुक्रवार या दिवशी खूप मोठा बाजार असल्यामुळे बाजारामध्ये खूप मोठी गर्दी असते या गर्दीमध्ये सुद्धा मोकाट जनावरे बाजारामध्ये फिरतात यामुळे बाजार करणाऱ्या महिला पुरुषांना सुद्धा खूप त्रास होतो.तरी नगरपरिषद प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जनावरांना कोंडवाड्यात टाकावे मोकाट जनावरे जास्त प्रमाणात वाढलेआहेत यामुळे नागरिकांना त्रास होतो हा त्रास होऊ नये यासाठी नगरपरिषद प्रशासनाने जनावरांना कोंडवाड्यात टाकून जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी अंबाजोगाई शहरातील नागरीक करत आहेत

# आज कैलास गोरंट्याल यांचा मुंबईत भाजप प्रवेश

जालना । प्रतिनिधी

३५ वर्षापासून काँग्रेसमध्ये एक कनिष्ठ राहणारे जालना शहराचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा आज भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय झाला असून, प्रवेश सोहळा ३१ जुलै रोजी मुंबईत होणार आहे. दरम्यान गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशामुळे पुर्वाश्रमीचे भाजपाचे पदाधिकारी, २-३ कार्यकर्त्यांसोबत प्रवेश सोहळे करणारे चिंताक्रांत झालेले दिसत आहे. एकुण दरम्यान गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशामुळे काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जात असून भाजपाची ताकद स्थानिक निवडणुकांमध्ये वाढण्याचे संकेत आहेत.



कैलाश गोरंट्याल यांचा स्वतंत्र पक्षप्रवेश सोहळा गुरुवारी (दि. ३१) मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात त्यांच्यासोबत काँग्रेसमधील अनेक माजी नगरसेवक, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यही भाजपात प्रवेश करणार आहेत.

कैलास गोरंटचाल यांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष नारायण कुचे आणि मंत्री अतुल सावे यांच्याशी चर्चा करून पक्षप्रवेशाची तारीख निश्चित केली आहे. गोरंट्याल यांनी सांगितले की, आगामी महापालिका निवडणुकीत ते स्वबळावर लडण्याची तयारी करत आहेत आणि याबाबतची भूमिका ते भाजपा नेत्यांसमोर मांडणार आहेत.

कैलास गोरंट्याल हे गेल्या ३५ वर्षांपासून काँग्रेसमध्ये सक्रिय होते. १९९९, २००९ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी जालना मतदारसंघातून विजय मिळवला होता. सध्या ते काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते.. विशेष म्हणजे, गेल्या दहा वर्षांपासून जालना नगरपालिकेवर श्यांची मजबूत पकड होती. त्यांच्या पत्नी संगीता गोरंट्याल यांनीही ५ वर्षे जालना नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली आहे मा. आ. गोरंट्याल यांच्या भाजपा प्रवेशामुळे भाजपाची ताकद वाढण्याची शक्यता आहे. याउलट, काँग्रेसची ताकद कमी होऊ शकते. जालना महापालिका निवडणुकीचे राजकीय वातावरण आता आणखी तापण्याची चिन्हे आहेत, कारण या पक्षप्रवेशांमुळे स्थानिक पातळीवरील निवडणुकांमध्ये नवीन आव्हाने आणि संधी निर्माण होणार आहेत. तर पुर्वाश्रमीचे व भाजपा पक्ष संघटन मजबुत करणाऱ्या पदाधिकारी, नेत्यांचे चेहरे मात्र चिंताक्रांत दिसत आहे.

# केएसके महाविद्यालयात संपूर्ण आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक उपचार

बीड। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि हेल्थ सेंटर यांच्या वतीने युनिकेअर हेल्थ सेंटर,ठाणे यांच्या वतीने महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. त्यात मधुमेह,रक्तदाब, नाडी परिक्षण,डॉक्टर सल्ला, वैयक्तीक आहार सल्ला,योगा मार्गदर्शन,बीएमआय, प्रकृती निदान, संपूर्ण बॉडी ॲनालिसीसव ब्लड टेस्ट करण्यात आले.

दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ११.०० वा.आयोजित संपूर्ण आरोग्य तपासणी व आयुर्वेद उपचार शिबीराचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते व डॉ.सुनिल महाजन युनिक केअर



हेल्थ सेंटर,ठाणे यांच्या उपस्थितीत शिबीरास सुरूवात होऊन त्यात महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून विविध प्रकारचे उपचार व सल्ला घेण्यात आला.या वेळी आरोग्यसल्लागार करून कौशिक सुर्वे,प्रथमेश नारकर, तृप्ती आसकर, हर्षल भालेराव, दिपाली परब यांनी उपस्थित शिबीरार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.यादव घोडके तर आभार प्रदर्शन डॉ.व्ही.एस.फटाले यांनी केले.

# खा.कल्याण काळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती

जालना । प्रतिनिधी

जालना-छत्रपती संभाजीनगर लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे यांची प्रदेश स्तरावर मोठी जबाबदारी देण्यात आली तसेच खा. डॉ. कल्याण वैजिनाथराव काळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत असून, विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



डॉ. काळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, स्पष्ट विचारसरणी आणि जनतेशी असलेल्या दृढ नात्याला ही नियुक्ती म्हणजे काँग्रेस पक्षाची अधिकृत मान्यता असल्याचे म्हटले जात आहे.

राजकीय क्षेत्रात डॉ. काळे यांचा प्रदीर्घ आणि समृद्ध असा कार्यानुभव आहे. पंचायत समिती संभाजीनगरचे उपसभापती, देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक, तसेच औरंगाबाद पूर्व व फुलंब्री या दोन विधानसभा मतदारसंघांतून एकवेळ आमदार अशी लोकप्रतिनिधीची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी युवाशक्तीला दिशा दिली असून, २०२० पासून ते औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी ते महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# दोन पत्राच्या घरामध्ये राहणाऱ्यांना १५ हजाराचे विजबिल

## उदयसिंह बोराडे थेट वीजवितरण कार्यालयात

जालना । प्रतिनिधी

मंठा शहरातील नागरिकांना वीज महावितरण कंपनीने बसवलेल्या नव्या मीटरमुळे प्रचंड आर्थिक फटका बसत आहे. दोन पत्रांच्या घरांमध्ये राहणाऱ्या सामान्य कुटुंबांना महिन्याला तब्बल १५ ते २० हजार रुपयांचे बिल येत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्याकडे नागरिकांनी तक्रारींचा भडिमार केला. नागरिकांच्या या व्यथांना तात्काळ प्रतिसाद देत बोराडे यांनी संबंधित वीजवितरण अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि वीजबिलांच्या अन्यायकारक आकारणीबाबत तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सांगितले की, ''सामान्य माणसाच्या खिशावर डल्ला मारणं खपवून घेतलं जाणार नाही!'' तसेच तात्काळ या तक्रारींचे निराकरण करावं, अन्यथा आंदोलनाच्या इशाराही त्यांनी दिला.

या भेटीदरम्यान अनेक वीज ग्राहक देखील उपस्थित होते. त्यांनी थेट बोराडे यांच्या उपस्थितीत



आपापल्या अडचणी सांगितल्या. काही जणांनी आधीच्या तुलनेत दुप्पट-तिप्पट आलेल्या बिलांचे उदाहरण देत आपल्या समस्या मांडल्या.शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या या तत्परतेमुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत असून, वीज महावितरणच्या मनमानी कारभाराला लगाम बसावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी उपतालुकाप्रमुख रामराव वरकड,उपशहर प्रमुख दत्तात्रय बोराडे, उपतालुकाप्रमुख बाळासाहेब देशमुख, गोस भाई, इस्माईल भाई, व मंठा शहरातील मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# रेड रण मॅरेथॉन स्पर्धेत रजत बायस प्रथम

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचने नुसार आंतरराष्ट्रीय युवा दिन व पंधरवाडा १२ ऑगस्ट २६ ऑगस्ट या कालावधीत राबविला जातो त्या अनुषंगाने जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा रूग्णालय,बीड यांच्या वतीने जिल्हयातील रेड रिबन क्लब महाविद्यालयीन युवक युवती यांच्यासाठी जिल्हास्तरीय पाच किलोमीटर रेड रण मॅरेथॉन स्पर्धेचे बीड येथे आयोजिन करण्यात आले होते.या स्पर्धे साठी जिल्हयातील एकूण पंधरा रेड रण स्थापित महाविद्यालयातील ४३ युवक युवतीनी सक्रिय सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उदघाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत व जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या रजत कन्हैया सिंग बायस या खेळाडूंने मुलांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून विजेत्यांना अनुक्रमे प्रथम क्रमांक रूपये २ हजार व मेडल प्रदान करण्यात आले.

खेळाडूच्या या यशाबद्दल अध्यक्ष



श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही.क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भागचंद सानप, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर,डॉ. अमृतसिंग बिसेन तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# वंचितअपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा लाभ घ्यावा-राजेंद्र मस्के

## गेवराई मध्ये दिव्यांग शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्याचे खा. बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या संकल्पनेतुन सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, भारतीय कृत्रिम अंग निर्माण, जिल्हा प्रशासन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभरात प्रत्येक तालुका निहाय दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. आज गेवराई येथील पंचायत समिती येथे शिबिर संपन्न झाले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अपंग तथा दिव्यांग व्यक्तींसाठी शासनाच्या विविध योजना असून प्रत्येक अपंग व्यक्तींना योजनेचा लाभ आणि अत्यावश्यक उपकरण आणि



साधन मिळाली पाहिजेत. अनेक अपंग व्यक्ती योजने पासून वंचित आहेत. यासाठी दिव्यांग शिबिराचे आयोजन केले जात आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकां साठी कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने मोफत वाटपासाठी पूर्व तपासणी व नोंदणी करून पात्र दिव्यांगांना कृत्रिम अवयव व उपकरणाचे वाटप केले जाणार आहे. वंचित तथा गरजू अपंग व्यक्तींनी दिव्यांग शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी केले आहे. दिव्यांगांना शासनाच्या प्रत्येक योजनेचा फायदा मिळाला पाहिजे, नियमितपणे वेळेवर मानधन वाटप व्हावे, मानधनात वाढ करावी, दिव्यांगांच्या घरकुल कोट्यात वाढ करून जास्तीत जास्त घरकुलाचे वितरण व्हावे अशी मागणी काही दिव्यांग व्यक्तींनी यावेळी केली.

# बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना चाबी सुपूर्द



जालना । प्रतिनिधी

३० जुलै रोजी नगरपंचायत कार्यालय मंठा येथे शासनाच्या १५० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत मा.मुख्याधिकारी श्री मनोज उकिर्डे यांच्या सूचनेप्रमाणे व मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री आवास योजना १.० व प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत कॅम्प घेऊन प्रधानमंत्री आवास योजना १.० अंतर्गत मुख्याधिकारी,नगराध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेप्रमाणे ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

अशा लाभार्थ्यांना चाबी व तसेच नवीन लाभार्थ्यांना पहिला हप्त्याची अनुदान देण्यात आले यावेळी नगरपंचायतचे नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे ,उपाध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक दीपक बोराडे, जमीर कुरेशी, नगर अभियंता अविनाश चव्हाण, शहरस्तरीय करणे संकेत देशमुख, लेखापाल चंद्रकांत दामोदार व तसेच यावेळी इतर कर्मचारी उपस्थिती होती व सन्माननीय सदस्य यांच्या हस्ते पहिल्या टप्प्याच्या अनुदानाचे धनादेश व बांधकाम पूर्ण असलेल्या लाभार्थीना चावी देण्यात आली त्याचप्रमाणे ज्या लाभार्थ्यांचे बांधकाम अद्याप चालू नाही अशा लाभार्थ्यांना बांधकाम करण्याबाबत सूचना करण्यात आल्या व यापूर्वी देण्यात आलेल्या नोटीस प्रमाणे या कार्यालयास प्राप्त अर्जानुसार लाभार्थ्यांना प्रधान मंत्री आवास योजना १.० अंतर्गत बांधकाम परवानगी देण्यात आली. या वेळी सर्व कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

# काँग्रेसमुक्त भाजपा म्हणाणारा भाजपा पक्षच आता काँग्रेसयुक्त

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

जालना । प्रतिनिधी

भाजपाकडे स्वतःचे नेते नसून, ते काँग्रेसचे नेते आयात करीत असून, काँग्रेसमुक्त भाजपा म्हणाणारा भाजपा पक्षच आता काँग्रेस युक्त होत असल्याची टीका त्यांनी केली. तसेच कितीही नेते पक्षाला सोडून गेलेतरी वेणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या बळावर काँग्रेस दैदीप्यमान यश संपादीत करेल, असा विश्वास असून, आजच्या बीकट परिस्थिती पक्षाला सोडून जाणे योग्य नसल्याचेही प्रदेशाध्यक्ष आ. हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मंगळवारी (ता. २९) येथे आयोजित पत्रकार परिषदेत म्हणाले. काँग्रेस पक्षबांधणीच्या अनुषंगाने जालना दौऱ्यावर आलेले आ. सपकाळ यांनी खा. कल्याणराव काळे यांच्या कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राजेंद्र देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यकर्त्यांचा पक्ष म्हणुन काँग्रेसची ओळख आहे त्यामुळे पक्षाची खरी ताकद ही कार्यकर्ता असून, ज्यांना पक्षाने तिकीटे दिली आणि आमदार-खासदार केले ती मंडळी इतर कुठल्या पक्षात गेलीत तर पक्षाला काहीही फरक पडत नाही, असे सांगतांनाच भाजपात जाणाम्यांना आमचा नांदा सौख्यभरेचा सल्ला त्यांनी दिला. यावेळी आ. सपकाळ पुढे म्हणाले की, काँग्रेसमधुन इतर पक्षात काहीजण प्जात असलेतरी लवकरच जिल्हानिहाय पक्षबांधणी करून नव्या दक्षाची टीम पुढे आणली जाणार आहे. तसेच इतर पक्षात जाणारे ही मंडळी केवळ स्वतःच्या अख्मणी सोडविण्यासाठी पक्षांतर करीत आहे. त्यासोबतच भाजपारुपी राक्षस सत्तेचा आणि पैशाचा पुरेपुरे वापर करून इतर पक्षांची तोडफोड करणाऱ्याला महत्व देत आहे भात्र, सुरुवातीपासून शिस्तीचा पक्ष म्हणुन काँग्रेसची ओळख आहे हे सर्वश्रुत असल्याचे आ. सपकाळ यांनी सांगितले. राज्यात महिलांवर अत्याचाराचे प्रकार वाढत चालले असून, पुरोगामी महाराष्ट्र म्हणुन लाभलेल्या ओळखीचाही सत्ताधाऱ्यांना विसर पडत चालला आहे. एकप्रकारे लोकशाही गुंडाळून ठेवण्याचा प्रकार सुरु असल्याचे सांगतांना लाकड्या बहीण योजनेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याची टीकाही आ. सपकाळ यांनी केली. कोणीही मी-मी म्हणणाऱ्या नेता जेंव्हा काँग्रेसमधुन बाहेर पडून इतर पक्षात जातो तेंव्हा तो एकटाच पक्षातुन जात असतो आणि मुळ कार्यकर्ते हे कायम पक्षात सोबत राहात असतात असे आपले मानने असून, काँग्रेसचे उपाध्यक्ष कैलास गोरंट्याल यांची समजुन घालण्याचा खा. कल्याण काळे यांनी प्रयत्न केला. मात्र, त्यात यश आले नसल्याची माहिती देतांनाच भय आणि लालचीतुन ते इतर पक्षात जात असल्याचे आ. सपकाळ यांनी सांगितले.

# डॉ.राम चव्हाण यांचा निरोप समारंभ

बीड । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथील राष्ट्रमाता जिजाऊ महाविद्यालयात १८ वर्षे अध्यापक म्हणून कार्य केलेले प्राध्यापक डॉ.रामराव जनार्धनराव चव्हाण यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गुरुवारी (दि.३१) निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.



डॉ.चव्हाण हे गेल्या ३४ वर्षापासून अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९९२ ते २००८ पर्यंत त्यांनी किल्लेधारुर येथील राष्ट्रमाता जिजाऊ महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून कार्य केले. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणीशास्त्र प्राणीशास्त्र विभागात १८ वर्षे प्रपाठक, प्राध्यापक म्हणून सेवा केली.

या काळात त्यांनी अधिसभा सदस्य, रासेयो संचालक, ग्रामीण समस्या संशोधन केंद्र, विलासराव देशमुख अध्यासन, मॉडेल कॉलेजचे प्राचार्य आदी पदांवर कार्य केले आहे. दोन महिन्यापासून मशिप्र मंडळाच्या मुक्तानंद महाविद्यालयात प्राचार्यपदी कार्यरत आहेत. विद्यापीठातून त्यांनी धारणाधिकार घेतला आहे. विद्यापीठाच्या सेवेतून ते (दि.३१) जुलै रोजी निवृत्त होत आहेत. या निमित्त मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले सभागृहात निरोप समारंभ घेण्यात येईल. यावेळी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. तत्पूर्वी प्राणीशास्त्र विभागातही सकाळी ११ ते १ या दरम्यान विभागातर्फे निरोप समारंभ घेण्यात येणार आहे., असे विभागप्रमुख डॉ.सुनिता बोर्डे यांनी कळविले आहे.

# जनतेच्या प्रश्नासाठी शासनाचे विविध उपक्रम





## एक ते सात ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत दिनांक १ ऑगस्ट रोजी " महसूल दिन " व १ ते ७ ऑगस्ट दरम्यान " महसूल सप्ताह " राज्यभर साजरा केला जाणार आहे . यामध्ये सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांतून विविध समाजोपयोगी उपक्रम , जनजागृती मोहिमा व योजनांचे थेट लाभ वितरण केले जाणार आहे . याचा उद्देश नागरिकांना महसूल विभागाच्या सेवांबाबत जागरूक करणे व त्यांचा थेट सहभाग वाढवणे आहे.**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत . सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी त्यांनी जनता दरबार सुरू केला . अनेक तालुक्यांना सुद्धा भेटी दिल्या . बाल विवाहप्रथा , शेतकरी आत्महत्या या विषयावर ते पोटतिडकीने बोलत असतात . महसूल सप्ताहाच्या प्रारंभदिनी , १ ऑगस्ट रोजी " महसूल दिन साजरा " केला जाईल . या दिवशी जिल्हास्तरीय अधिकारी , पोलीस , महसूल कर्मचारी यांचा सत्कार तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे . विविध योजनांचे प्रमाणपत्र वितरण समारंभही होणार आहेत.२ ऑगस्ट रोजी शासन निर्णयानुसार २०११ च्या पूर्वीपासून ताब्यात असलेल्या जमीनधारक कुटुंबांना नियमित करण्याची कार्यवाही होईल . त्यांच्यासाठी लाभ वाटप आणि माहिती कार्यक्रम आयोजित केला जाईल . शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबाना ग्रामविकास विभाग , शासन निर्णय , दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार दिनांक १ जानेवारी, २०११ पूर्वीच्या ग्रामीण भागातील शासकीय जमिनींवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे असलेल्या नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा केली आहे . तर , नगर विकास विभाग , शासन निर्णय , दिनांक ११ सप्टेंबर , २०१९ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या खाजगी जमिनीवरील अतिक्रमणधारकांना पट्टेवाटप करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करणेबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे.३ ऑगस्टला शिवपानंद रस्त्यांच्या अडथळ्यांबाबत तक्रारींचे निवारण व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे प्रस्ताव तयार करण्याचे काम होईल . तसेच सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून झाडे लावण्याचेही कार्यक्रम राबवले जातील. ४ ऑगस्टला " छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान " अंतर्गत सर्व मंडळांमध्ये माहिती व मार्गदर्शन कार्यक्रम होतील . जनतेला आवश्यक कागदपत्रे आणि आराखडे उपलब्ध करून देण्यात येतील. ५ ऑगस्ट रोजी डी बी टी ( डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर ) अंतर्गत लाभ मिळालेल्या व न मिळालेल्या लाभार्थ्यांबाबत घरपोच सेवा देऊन डिबीटीचा थेट लाभ मिळवून देण्याचे उपक्रम राबवले जातील. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत निर्णयनिर्देश व पुनर्प्रस्ताव तयार करण्याचे काम केले जाईल.

पान ३ वर

## जिल्हा परिषदेचे कॅफो सुरेश केंद्रे यांचा आज सेवापूर्ती सन्मान सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश गंगाधर केंद्रे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी सायं. ६.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे तर अध्यक्षस्थानी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची उपस्थिती राहणार आहे.



या सेवापूर्ती सोहळ्यास अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गलगुंडे, सहाय्यक संचालक राजेश्वर माने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, किशोर काळे, जिल्हा प्रकल्प अधिकारी मनोज ससे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी , शिक्षणाधिकारी (मा. ) प्रियाराणी पाटील, कार्यकारी अभियंता मोमिन सय्यद, विजय सपकाळे, सुनील धाबेकर, जिल्हा पशुधन अधिकारी आर.डी. कदम, समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस. एन. मेश्राम, कृषी अधिकारी सय्यद, जिल्हा जल संधारण अधिकारी सय्यद हमीद आदींची उपस्थिती राहणार आहे. नीलकमल हॉटेल, बीड येथे होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या वित्त विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ॲड.सुनील कुलकर्णी यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील ॲड.सुनील मधुकरराव कुलकर्णी (मोगरेकर) यांचे दि ३० जुलै बुधवार रोजी निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे माजलगाव शहरात शोककळा पसरली आहे.



ॲड.कुलकर्णी हे गेल्या अनेक दशकांपासून कायदा क्षेत्रात कार्यरत होते. आपल्या प्रामाणिक आणि सुसंस्कृत वृत्तीमुळे त्यांनी समाजामध्ये एक वेगळे स्थान निर्माण केले होते.ते विजया अर्बन मल्टीस्टेटचे व्यवस्थापक अनिल मोगरेकर आणि अभियंता सुरेश मोगरेकर यांचे बंधू होते.त्यांच्या पश्चात वृद्ध आई,पत्नी, एक विवाहित मुलगा,मुलगी, जावई,सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबीयांवर आणि मित्रपरिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.त्यांच्यावर शहरात शोकाकुल वातावरणात मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध सामाजिक, व्यावसायिक व कायदेशीर क्षेत्रातील मान्यवरांनी निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : रमेश गवळी

दिंद्रुड । प्रतिनिधी

तळागाळातील समाजाच्या तरुणांनी डॉक्टर, वकील, पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना मनी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथरावजी (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा



१ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे पार पडत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर भूषवणार आहेत. तर उद्घाटक म्हणून दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आवाड हे असणार आहेत.तरी माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक रमेश गवळी यांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके, मा.आ मोहनराव सोळंके, पान ३ वर

## खतविक्रेत्यांना ई-पॉस प्रणाली अनिवार्य

### नियमांचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द होणार!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांनी अनुदानित रासायनिक खतांची विक्री ई-पॉस (-) प्रणालीद्वारे करणे बंधनकारक आहे. खत विक्रीच्या नोंदी तात्काळ आणि अचूकपणे या प्रणालीमध्ये समाविष्ट होणे अत्यंत आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

ई-पॉस आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत नसावी:

विक्रेत्यांच्या ई-पॉस प्रणालीवरील खत साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यात कोणतीही तफावत आढळू नये, यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. रासायनिक खतांच्या विक्रीची नोंद प्रणालीमध्ये तत्काळ ( ) घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. क्षेत्रीय स्तरावरील खत निरीक्षकांना या संदर्भात नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या विक्रेत्यांकडे ई-पॉसवरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठा यात फरक आढळेल, त्यांच्या परवान्यांवर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना परवाना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पान ३ वर

## अशोक डक विरोधात विधानसभा अध्यक्ष व तालुकाध्यक्षाची अजित पवारांकडे तक्रार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील अशोक गोविंदराव डक यांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात काम केले असल्याने त्यांचेवर कारवाई करावी तसेच पक्षाच्या नेत्याचे फोटो व पक्षाचे चिन्ह वापरण्यास मनाई करून पक्षातुन हकालपट्टी करावी अशी मागणी मतदारसंघाचे विधानसभा अध्यक्ष व मतदार संघातील तालुकाध्यक्षांनी राष्ट्रादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचेकडे केली आहे.**

दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अशोक डक यांनी २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघ ता. माजलगाव जि. बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार यांच्या विरोधात काम केले असून आता पक्ष सत्तेत आल्यानंतर ना. अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पेपर ला जाहिराती देवुन घड्याळाचे चिन्ह जाहिरातीत टाकले आहे. तसेच ना. अजित पवार हे माजलगाव विधानसभा मतदारसंघात प्रचार सभेसाठी आले असतांना तत्कालीन मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक होते. पदावर असतांना देखील यांनी त्यावेळेस पेपरला जाहिरात दिली नाही, स्वागताचे होल्डींग बॅनर लावले नाही. व आता सभेकडे फिरकल देखील नाहीत, ना. अजित पवार यांच्या वाढदिवसाचे शहरभर होल्डींग लावुन व पेपरला जाहिरात देवुन मी स्वत: पक्षाचा नेता असल्याचे भासवत आहे. व माझी कधी न संपणारी प्रेरणा ना. अजित पवार आहेत असे भासवत आहेत. यामुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत आहे. त्यामुळे अध्यक्षानी याची दखल घेवुन संबंधित व्यक्तीस पक्षाचे चिंन्ह व पक्षाच्या नेत्याचे फोटो वापरण्यास मनाई करावी व पक्षातुन कायमस्वरूपी हकालपट्टी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर माजलगाव विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप, वडवणी तालुकाध्यक्ष महादेव साबळे यांच्या स्वाक्षरी आहेत.

## कृषि खात्याकडून माजलगाव येथील कृषी केंद्राची तपासणी



माजलगाव । प्रतिनिधी

येथील कृषीकेंद्रा कडून शेतकऱ्यांना युरिया खातासह विविध खते मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्याकडून प्राप्त झाल्यानंतर शेतकरी कामगार पक्षाने जिल्हा गुण नियंत्रक,जिल्हा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी,तालुका गुण नियंत्रक यांच्याकडे तक्रार करून कृषी सेवा केंद्राच्या व त्यांच्या गोडाऊनच्या दि २९ जुलै मंगळवार रोजी तपासण्या करुन त्यांचे पंचनामे करण्यात पान ३ वर

## डॉ.जाधव यांच्या 'एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य' या ग्रंथास राज्यपुरस्कार

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा लीलाताई भागवत राज्यस्तरीय पुरस्कार शिरूर कासार येथील साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य' या समीक्षा ग्रंथास जाहीर झाला आहे. दि. २ ऑगस्ट रोजी लता मंगेशकर सभागृह, मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, प्रसाद भडसावळे यांचे हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू कार्यवाह अनिल कुलकर्णी यांनी हे पुरस्कार पुणे येथे (दि.२३) रोजी जाहीर केले.

पांढरा कावळा बालकादंबरी, तिवढा आणि रानरांगूळ हे दोन कथासंग्रह, उंदरीन सुंदरीन, अटर का पटर, गर्भकळा, आलं आभाळ भरून हे चार कवितासंग्रह प्रकाशित आहेत. मानवता व्हाउचर लेखसंग्रह आणि एकविसाव्या शतकारंभीचे बालसाहित्य समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी उत्कृष्ट वाङ्मय राज्य पुरस्कारांसह अनेक पुरस्कार लाभले आहेत. एमजीएम विद्यापीठ, छ. संभाजीनगर आणि अकरावी- बारावी वर्गासाठीच्या अभ्यासक्रमात त्यांचे कवितासंग्रह समाविष्ट आहेत. पुरस्कार वितरण समारंभावेळी बालसाहित्यिक बबन शिंदे (हिंगोली), डॉ. विनोद सिनकर, (छ. संभाजीनगर), सुहास सदावर्ते (जालना), शिवाजी नागणे (सोलापूर) यांची उपस्थिती राहणार आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवास उपस्थित रहा

माजलगाव । प्रतिनिधी

तळागाळातील समाजातील तरुणांनी डॉक्टर, वकील,पोलीस, कलेक्टर झाले पाहिजे ही संकल्पना उराशी बाळगून समस्त दलित चळवळीच्या एकेकाळी पाठीचा कणा राहिलेल्या दिवंगत कर्मवीर एकनाथराव (जीजा) आवाड यांच्या विचार धारेचा समाज घडविण्याचा वसा अंगीकृत करून समाजाला समविचारी विचार धारेशी जोडण्याचे काम करत असलेले मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी हक्क अभियान बीड जिल्हा शाखा माजलगाव आयोजित



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा दि ०१ ऑगस्ट रोजी दुपारी ठिक २:०० वाजता शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयमाजलगाव येथे पार पडत आहे.

## इनरव्हील क्लबने सामाजिक कार्यातून आदर्श निर्माण केला - तहसीलदार तरंगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील तहसील कार्यालयामध्ये इनरव्हील क्लब अंबाजोगाई शाखेच्या वतीने नुकतेच हिरकणी कक्षाची स्थापना केली. या हिरकणी कक्षाचे उद्घाटन अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते संपन्न झाले.

या सामाजिक उपक्रमाला प्रशासकीय व सामाजिक स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यावेळी निवासी नायब तहसीलदार सचिन देशपांडे, नायब तहसीलदार स्मिता बाहेती, नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.




उद्घाटन प्रसंगी तहसीलदार विलास तरंगे यांनी हिरकणी कक्षाच्या संकल्पनेचे व इनरव्हील क्लबच्या कार्याचे कौतुक करीत इनरव्हील क्लबने समाज उपयोगी काम करेल एक सामाजिक आदर्श निर्माण केला आहे व त्यांच्या इतर सामाजिक उपक्रमांनाही आम्ही सकारात्मक प्रतिसाद देऊन असे आश्वासन दिले. उद्घाटन प्रसंगी बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी हिरकणी कक्ष ही प्रत्येक कार्यालयामधील अत्यावश्यक असलेली गोष्ट आहे.

## कुसळंब घाटातील खडीचे ढिगारे सपाट करून रस्ता वाहतुकीस सुरळीत करण्याची मागणी

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील कुसळंब ते पिंपळवंडी दरम्यान असलेल्या धोपटवाडी ते कुसळंब घाटातील प्रमुख रस्त्याचे मागील काही महिन्यापासून काम चालू असून डांबरीकरणासाठी घाटात रस्त्याच्या एका बाजूने मोठ-मोठाले दगड आणून त्याची खडी तयार केली असून त्या खडीचे ढिगारे सडकेवर लवकरात-लवकर टाकून सपाटीकरण करून रस्त्याचे डांबरीकरण करावे व रस्ता वाहतुकीस मोकळा करावा अशी मागणी वाहन चालकाकडून व सामान्य जनता,प्रवासी वर्गातून होत आहे.**

याविषयी माहिती अशी की,कुसळंब घाटातील रस्ता दुरुस्तीचे काम सुरू झाल्यापासून पिंपळवंडी ते कुसळंब मार्गे जामखेड-पाटोदा या ठिकाणी जा-ये करणारी वाहनांची वाहतूक व रहदारी कमी झाल्याने जड-अवजड वाहनाप्रमाणे सामान्यांची लालपरी ''एसटी'' तसेच मालवाहतुकीचे साधन टेम्पो-ट्रक हे वाहने सुद्धा या मार्गावरून दळणवळणासाठी बंद असल्याने पिंपळवंडी येथील विद्यालयात शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी,जेष्ठ नागरिक,अपंग व्यक्ती एस.टी.ने सवलत दरात प्रवास करणाऱ्या महिला-पुरुषांची तसेच आजारी व्यक्तींची खूपच हेळसांड व गैरसोय होत आहे.याच



रस्त्याने पिंपळवंडी-अंमळनेर-कोतन-खोपटी-भडकेल व परिसरातील वाडी-वस्त्यातील ग्रामस्थांना पाटोदा येथे सरकारी कामानिमित्त प्रत्येक महत्त्वाच्या कार्यालयात जा-ये करावे लागते.तसेच जामखेड हे मुख्य बाजारपेठ व या ठिकाणी अनेक गंभीर आजारावर उपचार करणारे दवाखाने असल्याने या परिसरातील जनतेचा पाटोदा व जामखेड येथे सतत संपर्क असल्याने रस्त्याच्या कासवगतीने चाललेल्या कामामुळे ''एस.टी''ची वाहतूक बंद आहे त्यामुळे सामान्य जनता वैतागली असून नाविलाजाने मोठी आर्थिक जळ सोसवून खाजगी वाहनांचा आधार घेऊन मोठ्या संकटाशी सामना करावा लागत आहे. संबंधित बांधकाम विभागाने या गंभीर व ज्वलंत समस्येची दखल घेणे गरजेचे आहे.पण,सामान्य जनतेचे ना प्रशासनाला ना गुत्तेदाराला ना पुढाऱ्यांना काहीच देण घेण नाही. ''मुकी बिचारी,कुणी हाका'' हि अवस्था सामान्य गोरगरिबांसाठी अतिशोक्ती ठरणार नाही.एस.टी व रस्ता चालू करणे या विषयावर अनेक वेळा विविध वृत्तपत्राद्वारे लिखाण करूनही ''गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाला जाग येत नाही'' व सामान्यांची हेळसांड काही थांबत नाही.

## झिम्मा फुगडी फेराच्या तालावर माहेरवाशीणी थिरकल्या -जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

नागपंचमीचे औचित्य साधून स्त्री-शक्ती प्रतिष्ठान द्वारे आयोजित संस्कृतीचा संग-स्त्री-शक्तीचा रंग या कार्यक्रमाचे हनुमान मंदिर धानोरा रोड बीड येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजक प्रभागाच्या नगरसेविका जयश्रीताई विधाते यांनी परिसरातील भगिनींना एकत्रित करून झिम्मा फुगडी खेळ झोका या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात लहान मुलींपासून ८० वर्षापर्यंतच्या आजीनी सहभाग नोंदवला होता. तरुणाईलाही लाजवेल अशा गवळणीच्या तालावर ज्येष्ठ भगिनींनी ठेका धरला होता. होत्या. संस्कृती आणि मनोरंजनाने ओथंबून भरलेल्या या कार्यक्रमात पारंपारिक नागपंचमीची गाणी गवळणी आणि आधुनिक चित्रपट संगीत याचा संगम पाहायला मिळाला. जुन्या पिढीने नवीन पिढीला पारंपारिक गाणे ओव्या गाळणीन साद घातली तर तरुणाईंनी त्याला चित्रपट संगीताचा साज चढविला. या या कार्यक्रमात यशस्वी भगिनींना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमान मंदिराच्या ट्रस्टी मिश्रा भाभी, रामदासीताई सत्यभामाताई माने, इंगोले ताई, प्रा. संगीताताई शिंदे, प्रज्ञा गायकवाड, लांडगेताई, सोमवंशी मावशी, चव्हाण मावशी, आगे मावशी. सोळुके मावशी, ढाकणेताई, लाटेताई, कुलकर्णी आजी, बारगजे आजी, वनिताताई लोकरे, शोभाताई नागरगोजे, लिमकरताई, पंडीतताई, बावीकरताई, आरती आढुळ, यांच्या सहपरिसरातील असंख्य महीला भगीनींनचे सहकार्य लाभले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canal Road Beed, Tal. Dist. Beed-431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Chaure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email rajyaloktantra75@gmail.com NO. L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पार्टीत त्या महिलेला...; प्रांजल खेवलकरांच्या वकिलांचा खळबळजनक आरोप; पुणे पोलिसांवर ५० कोटींचा दावा ठोकणार

पुणे । प्रतिनिधी

रेव्ह पार्टी प्रकरणात पोलिसांनी एकूण सात जणांना अटक केली आहे. मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी पुणे जिल्हा सत्र न्यायालयात पार पडली. न्यायालयाने पाच पुरुष आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी तर दोन महिला आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आता या प्रकरणात डॉ. प्रांजल खेवलकर यांच्या विकलांनी केलेल्या दाव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

आरोपींकडून तपासात सहकार्य करण्यात येत नाही. एप्रिल आणि मे महिन्यातली त्याच हॉटेलमध्ये पार्टी झाली होती अशी माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. यावर प्रांजल खेवलकरांच्या वकिलांनी पोलिसांवर खोटी माहिती देत बदनामी केल्याचा गंभीर आरोप केला असून, त्यामुळे पुणे पोलिसांवर ५० कोटींचा दावा दाखल करणार असल्याचे सांगितले आहे. वकिलांनी केलेल्या





दाव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

विकलांचा दावा काय?

पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात अटकेत असलेल्या डॉ. प्रांजल खेवलकर यांच्यावर पोलिसांनी केलेली कारवाई बनावट आहे. ते त्यांना अडवण्याचा प्रयत्न करताहेत, असा आरोप वकिलांनी केला आहे. त्यामुळे पुणे पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे खेवलकर यांच्या वकिलांनी सांगितले आहे. हे सगळं प्रकरण प्रांजल खेवलकर यांच्यावर ट्रॅप लावून केलं असल्याचा खळबळजनक दावाही वकील विजयसिंह ठोंबरे पाटील यांनी केला आहे.

ती महिला पोलिसांनीच पाठवली होती

रेव्ह पार्टी प्रकरणात दोन्ही महिलांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावणी आहे. ईशा देवज्योत सिंग, प्राची गोपाल शर्मा अशी या महिला आरोपींची नावे आहेत. पोलिस राहुल नावाच्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. संबंधित व्यक्ती ड्रग्स पेडलर असल्याची प्राथमिक माहिती असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. त्यामुळे या पार्टीत ड्रग्सचा पुरवठा या व्यक्तीमार्फत झाला होता का? याचा तपास केला जात आहे. मात्र, खेवलकरांच्या वकिलांनी पोलिसांवरच थेट आरोप करत ज्या महिलेच्या पर्समध्ये कोकेन सापडलं ती पोलिसांनीच पाठवली होती, असा खळबळजक आरोप केला आहे.

### आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी समोर

पार्टी प्रकरणात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांच्या संपर्कात काही दिवसांपर्वी श्रीपाद यादव आणि निखिल पोपटाणी हे दोघे आले. या दोघांचीही पार्श्वभुमी गुन्हेगारी असल्याची माहिती समोर आली आहे. श्रीपाद यादव याच्यावर या आधी बेटींग प्रकरणात गुन्हे दाखल असून त्याला अनेकदा अटकही झाली होती. तर निखिल पोपटाणी याचा सिगारेटचा व्यवसाय असून तो देखील बेटींगच्या दुनियेत बुकी या नावाने ओळखला जातो.

# जेवणासाठी 'थांबा' घेतलेल्या बसमधील प्रवाशाला मारहाण, ९५ लाखांचं सोनं पळवलं; चौघे पळाले १ ताब्यात






पुणे । प्रतिनिधी

राज्यातील गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढ होत असून दिवसाढवळ्या दरोड्याच्या घटना घडत असल्याचं पुन्हा एकदा समोर आलं आहे. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कराड तालुक्यातील तासवडे टोलनाका परिसरात असणाऱ्या श्रावणी हॉटेल येथे बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मारहाण करत सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कोल्हापूरहून मुंबईला निघालेली एसटी बस येथील टोलनाक्याजवळी हॉटेलवर थांबलेली होती. त्यावेळी, चार ते पाच अज्ञातांनी कुरिअर गोल्ड पॅकिंगचा माल घेऊन धूम ठोकली. सुदैवाने जमावाने एका संशयितास पकडून पोलिसांच्या स्वाधान केलं आहे. याप्रकरणी, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

पुणे-बंगळुरू महामार्गावर कराड जवळील टोलनाका परिसरात असलेल्या हॉटेल श्रावणीजवळ ही खळबळजनक घटना घडली. याठिकाणी अनोळखी तीन ते चार संशयितांनी एसटीतून प्रवास करणाऱ्या कोल्हापूरमधील प्रशांत कुंडलिक शिंदे यांना मारहाण केली. तसेच त्यांच्या ताब्यातील कृष्णा कुरिअर कासार गल्ली कोल्हापूर येथील कुरियर गोल्ड पॅकिंग असलेला माल घेऊन हे चौघे पळून गेले आहेत. या बॅगमध्ये ३५ हजार रुपये रोकड आणि सोन्याचे दागिने असलेले लहान लहान २० डब्बे ठेवलेले होते, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे.

येथील परिसरात मारहाण केल्यानंतर संशयितांनी कारमधून साताऱ्याच्या दिशेने पलायन केल्याचे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले. या घटनेवेळी एका संशयिताला जमावाने पकडून पोलिसांच्या हवाली केले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही तळबीड पोलीस ठाण्यात सुरू आहे. त्यानुसार, प्रशांत कुंडलिक यांच्याकडून जबाब व तक्रार नोंद करुन घेतली जात आहे. दरम्यान, दिवसाढवळ्या झालेल्या लुटीमुळे आणि मारहाणीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# रिक्षा चालकानेच लुटले प्रवाशाला पोलिसांकडून तपास सुरू



पुणे । प्रतिनिधी

शहरात गुन्हेगारी वाढली असतानाच चोरीच्या घटनाही सातत्याने घडत आहे. रविवारी पहाटे अशीच एक चोरीची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुणे रेल्वे स्थानक परिसरात रविवारी पहाटे रिक्षाचालकाने दोन साथीदारांसह प्रवाशावर हल्ला करून जबरी चोरी केली. या प्रकरणी वानवडी पोलिसांत प्रवाशी तरुणाने तक्रार दिली असून, फरार आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत. ही घटना रविवारी पहाटे सव्वातीन ते चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

रिक्षाचालक आणि त्याच्या दोन साथीदारांने प्रवाशी तरुणावर हल्ला करत २८ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी विजय माने (वय २४, रा. नवी मुंबई) या तरुणाने तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे रेल्वे स्थानकावर तक्रारदार तरुण रिक्षाची वाट पाहत उभा होता. त्यावेळी एका रिक्षाचालकाने त्याच्याजवळ येऊन मी सोडतो असे सांगून तरुणाचा विश्वास संपादन केला. त्याचवेळी आणखी दोघेजण रिक्षात बसले.

रिक्षा टर्फ क्लब रेसकोर्समार्गे भैरोबा नाल्याच्या दिशेने जात असताना रिक्षाचालकाने दोन अनोळखी साथीदारांसह अचानक त्याच्या अंगावर हल्ला केला. खिशातील मोबील, अंगठी, सोन्याची बाळी आणि रोख रक्कम घेऊन आरोपी फरार झाले. यानंतर तरुणाने वानवडी पोलीस ठाणे गाठत घडलेल्या घटना पोलिसांना सांगितली. त्यानुसार पोलिलांनी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे. या घटनेने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अजित पवार यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना पत्र; तिन्ही राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकारणाची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६० (नाशिक फाटा ते खेड), राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ (हडपसर ते यवत), तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) या तिन्ही प्रमुख राष्ट्रीय महामार्गाचे तातडीने रुंदीकरण करावे,अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्राद्वारे केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

४ लेन असलेला रस्त्याचे ६ लेनमध्ये रुपांतर करावे - अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या पत्रात, पुणे महानगर आणि औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) - सध्या ४ लेन असलेला हा रस्ता ६ लेनमध्ये रुपांतर करावा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) - विद्यमान ४ लेन रस्त्याचे ६ लेनमध्ये रूपांतर करावा, तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) - सध्या २ लेन असलेला मार्ग ४ लेन करण्याची आवश्यकता आहे. या तिन्ही मार्गांवर शिक्षण संस्था, औद्योगिक पट्टा, वसाहती, रुग्णालये, पेट्रोलियम आणि वाहन उद्योग तसेच व्यापारी हब असल्यामुळे वाहतुकीचा ताण प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून वाहनचालकांच्या सुरक्षेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत असेही पत्रात म्हटले आहे.



वाहनांच्या संख्येची कमाल मर्यादा ओलांडली

या मार्गांवरील प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येची कमाल मर्यादा ओलांडली आहे. अशा परिस्थितीत या महामार्गावर तात्काळ लेन वाढवण्याचे काम करण्यात यावे, जेणेकरून येत्या काळात उभारल्या जाणाऱ्या एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामासाठीही पर्यायी मार्ग उपलब्ध होऊ शकेल. हे तिन्ही महामार्ग पुणे शहराच्या प्रवेशद्वारांशी जोडले गेलेले असल्यामुळे, बाह्य भागातील मोठ्या प्रमाणावर वाहने शहरात प्रवेश करताना मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. यामुळे या मार्गांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच, तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील रुंदीकरणाच्या कामास सध्या चालू असलेल्या एलिव्हेटेड हायवे निविदेच्या अंतिम टप्प्यापर्यंत तात्पुरता पर्याय म्हणूनही उपयोग होईल हेही अजित पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक निधी आणि प्रशासकीय मंजुरी तातडीने मिळवून देण्याची विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे, जेणेकरून पुणे औद्योगिक परिसरातील वाहतूक समस्या दूर होण्यास मदत होईल.

# मामासाहेब खांडगे शाळेत कारगिल विजय दिन उत्साहात

**तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी**


**कारगिल विजय दिनानिमित्त मामासाहेब खांडगे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी भारतीय सैनिकांच्या शौर्य व बलिदानाला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. विद्यार्थ्यांच्या सहभागाने आणि देशभक्तीच्या वातावरणात हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

आपल्या प्रेरणादायी भाषणात सेवानिवृत्त अधिकारी बबन संभेराव यांनी कारगिल युद्धातील स्वतःच्या अनुभवांचे स्मरण करून दिले. त्यांनी आपल्या सेवेतील शौर्यगाथा सांगत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचा भाव जागवला. कार्यक्रमात कारगिल युद्धाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित माहितीपूर्ण चित्रफितीचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सैनिकांना समर्पित देशभक्तिपर गीतांद्वारे त्यांचे आभार मानले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सेनेचे सेवानिवृत्त अधिकारी बबन संभेराव आणि अ्धडऋ संस्थेचे संचालक रमेश रामराव वराडे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिकाही यावेळी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि प्रशासनाच्या सहकार्याने पार पडले.

# शहरात होणार दोन वरिष्ठ न्यायालयांची स्थापना

पिंपरी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून वकील आणि नागरिकांच्या मागणीला अखेर यश आले असून शहरात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अशा दोन न्यायालयांची स्थापना व पदांना मंजुरी मिळाली आहे. यामुळे शहरात आता या दोन वरिष्ठ न्यायालयांची स्थापना होणार असून पिंपरी-चिंचवडकरांना पुण्याला माराव्या लागणाऱ्या चकरा कमी होणार आहेत. शहरात ही न्यायालये स्थापन व्हावीत, या करिता पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशन व वकिलांनी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला होता. मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटमध्ये अंतिम मंजुरी मिळताच वकिलांनी आनंद व्यक्त केला आहे.



पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनने प्रसिद्धीस दिलेल्या माहितीनुसार पिंपरी चिंचवड शहरासाठी प्रस्तावित दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयासाठी आजच्या मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट मध्ये अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये शहरासाठी एक अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तर एक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर मंजूर करण्यात आलेले आहे. काही महिन्यांच्या कालावधीत हे नवीन न्यायालय शहराच्या सेवेत कार्यरत होणार असून, आता शहरातील नागरिकांना पुणे येथील न्यायालयात जाण्याची गरज पडणार नाही.

हे न्यायालय मंजूर करून घेण्यासाठी आज पिंपरी चिंचवड डव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. गौरव वाळुंज, सचिव ड. उमेश खंदारे, माजी सचिव ड. धनंजय कोकणे व सदस्य ड. राजेश राजपुरोहित यांच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे त्याचबरोबर विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, सह -सचिव विलास गायकवाड यांची भेट घेत पाठपुरावा केला. या बाबतची अंतिम मंजुरी काही वेळापूर्वी मंत्रिमंडळात जाहीर करण्यात आली.

# भीषण अपघात! दोन कंटेनर, पीकअप व तीन दुचाकींची धडक; चार जण जखमी, एकाची प्रकृती गंभीर

खेड शिवापूर : पुणे-सातारा महामार्गावरील वेळू येथील डब्ल्यूओएम कंपनीसमोर बुधवारी सकाळी सुमारे नऊ वाजता मोठा अपघात झाला आहे. या विचित्र अपघातात दोन कंटेनर, एक पीकअप आणि तीन दुचाकींचा समावेश असून चार जण जखमी झाले आहेत. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साताऱ्याकडून पुण्याकडे जाणारा एक कंटेनर ससेवाडी उड्डाण पुलावर आला असता, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे कंटेनर विरुद्ध लेनमध्ये म्हणजेच पुणेहून साताऱ्याकडे जाणाऱ्या मार्गावर जाऊन आदळला. या अनियंत्रित कंटेनरने पुढील एक कंटेनर, एक पीकअप आणि तीन दुचाकींना जोरदार धडक दिली.अपघातात चार जण जखमी झाले असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# नांदेड सिटी पोलिसांची कौशल्यपूर्ण कारवाई; केवळ २ तासांत खून उघडकीस

पुणे । प्रतिनिधी

नांदेड सिटी पोलीस स्टेशन येथील पोलिसांनी अवघ्या दोन तासांत खून प्रकरणाचा छडा लावत संशयित आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परतेचे प्रत्यंतर आले.घटना अशी घडली की, पोलीस अंमलदार शिवा क्षिरसागर हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना माहिती मिळाली की, प्रभात प्रेस रोडवरील साई धाम परिसरात एक इसम गंभीर जखमी अवस्थेत पडलेला आहे. माहितीची शहानिशा करण्यासाठी ते तात्काळ घटनास्थळी गेले असता, देवा उर्फ देविदास पालते ( २५) हा रक्ताच्या थारोळ्यात सापडला.

सदर माहिती वरिष्ठांना कळविल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल यादव व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमीस तात्काळ ससून रुग्णालयात रवाना केले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.पोलिसांनी तपास चक्रे फिरवताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दोन संशयित गजानन हरिश्चंद्र राठोड ( ३२, रा. यवतमाळ) व महारुद्र शिवाजी गवते ( २७, रा. धायरी, पुणे). याना. चौकशीत त्यांनी कबुली दिली की, मृत देवा याने गजानन राठोडचा मोबाईल परवानगीशिवाय घेतल्याने त्यांच्यात वाद झाला आणि त्या वादातूनच मारहाण झाली होती.या प्रकरणी नांदेड सिटी पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.ही कारवाई अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त संभाजी कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, गुन्हे निरीक्षक गुरुदत्त मोरे, सहायक निरीक्षक राहुल यादव व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदारांनी केली.

# भीक मागण्यासाठी पुण्यातून चिमुरडीचे अपहरण; तुळजापुरातील ५ जणांच्या टोळीचा पर्दाफाश

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कात्रज परिसरातून दोन वर्षांच्या चिमुरडीचे अपहरण करून तिला भीक मागायला लावण्यासाठी नेणाऱ्या एका टोळीचा भारती विद्यापीठ पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथून चिमुरडीची सुखरूप सुटका करत टोळीतील पाच जणांना अटक केली असून, यात एका महिलेचाही समावेश आहे.

अटक करण्यात आलेले आरोपी-

सुनील सिताराम भोसले (वय ५१) शंकर उजण्या पवार (वय ५०)

शालुबाई प्रकाश काळे (वय ४५)गणेश बाबू पवार (वय ३५)

मंगल हरफुल काळे (वय १९), हे सर्वजण मोतीझारा (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथील रहिवासी आहेत.



प्रकरणाचे नेमके काय घडले?

फिर्यादी धनसिंग हनुमंत काळे (वय २५) हे आपल्या कुटुंबासह कात्रजमधील वंडर सिटी परिसरातील झोपडी वजा घरात वास्तव्यास आहेत. त्यांना चार अपत्य असून त्यातील दोन वर्षांच्या जुळ्या मुली आहेत. घटना २५ जुलै रोजी रात्रीची आहे. रात्रीच्या सुमारास संपूर्ण कुटुंब झोपेत असताना, चिमुरडीला झोपाळ्यातून उचलून नेण्यात आले. मध्यरात्री जाग आल्यावर ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी उचललेली तत्काळ पावले-

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घटनेची गंभीर दखल घेत पीडित मुलीचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तपास पथके तयार करण्यात आली. याशिवाय गुन्हे शाखेने स्वतंत्र तपासपथक कार्यरत केले. तपासात वंडर सिटी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहण्यात आले. त्यात तीन जण एका दुचाकीवर मुलीसह जाताना दिसून आले. पोलिसांनी कात्रज ते पुणे रेल्वे स्थानक परिसरातील १४० सीसीटीव्ही फुटेज तपासले. रेल्वे स्थानकावरील फुटेजमध्ये आणखी दोघे आरोपी दिसून आले.

तुळजापूरवर छापा आणि चिमुरडीची सुटका-

फुटेज आणि माहितीच्या आधारे तपास पथक तुळजापूर येथे रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने सुरुवातीला तीन आरोपींना ताब्यात घेतले, आणि त्यांच्या ताब्यातून अपहृत चिमुरडी सुखरूप सापडली. पुढील चौकशीत उर्वरित दोन आरोपींनाही अटक करण्यात आली.

भीक मागण्यासाठी अपहरणाचे उघड-

आरोपींनी भीक मागण्यासाठीच चिमुरडीचे अपहरण केल्याची कबुली दिली. पाचही आरोपींना पुण्यात आणून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.